संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 4 | Issue : 5 | Marathi Monthly | Thane, 1 November 2026 to 30 November 2026 | Pages 16 | Price : 10/-



राज्यघटनाविरोधी (असंविधानिक) व देशहित आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणाऱ्या निवडणूक-आयोगाच्या कारभाराविरोधात 'धर्मराज्य पक्षा'चा एल्गार...मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची व त्यांना तुरुंगात धाडण्याची धर्मराज्य पक्षाची मागणी!



ज्ञानेश कुमार व राजीवकुमार या आजीमाजी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या (CEC) कारभाराबाबत राज्यघटनाविरोधी व असंविधानिक स्वरुपाचे गंभीर आक्षेप असून, त्यामुळे देशहित तसेच लोकशाही मुल्यांना बाधा पोहोचत असल्याचा आरोप करत...त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 'धर्मराज्य पक्षा'तर्फे २ ऑक्टोबर-२०२६ (शुक्रवार) महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी ठाण्यातील जांभळी नाका, चिंतामणी-दुकानाजवळ शांततामय व सनदशीर निदर्शने करण्यात आली.

धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी बोलताना **''महाभारतात जशी 'दुर्योधन, दुःशासन, कर्ण व शकुनी' ही एक षडयंत्रकारी चांडाळ चौकडी होती; तशीच आज 'नरेंद्र, अमित, ज्ञानेश आणि सीमा' ही नवी लोकशाहीविरोधी षडयंत्र रचणारी 'चौकडी' अस्तित्वात आलीय! महाभारतात, कर्णाची (हल्लीचा ज्ञानेश कुमार) कवचकुंडलं काढून घेणारा इंद्र मौजूद होता...पण, आताचा नवा इंद्र म्हणजेच, 'नरेंद्र'; त्या अधर्मी कर्णाला वर्ष-२०२३मध्ये पाशवी बहुमतावर कायदा करुन कवचकुंडलं बहाल करतोय; यालाच घोर कलियुग म्हणतात...या कलियुगात आपल्या मदतीला इंद्र येणं सोडाच...जिथे इंद्रच 'खलनायक' आहे; तिथे, आता आपल्यालाच 'कृष्ण आणि अर्जुन' बनून, या इंद्राला साथ देणाऱ्या, 'चौकडी'तील षडयंत्री कर्णाचा पाडाव करावा लागेल!'' असे प्रतिपादन केले.**

''ज्या वर्षी म्हणजे, वर्ष-२०२३ मध्ये अनूप बरनवाल जनहित-याचिकेचा निर्णय आला, त्याचवर्षी ...पृष्ठ क्र. ३ वर


अंतरंग



जंगल उजाड करून पर्यावरणपूरक विकास?
- जगदीश काबरे
पृष्ठ क्र. ४



''विजू नाटेकर ते प्रदीप पूर्णेकर'', ठाण्यातील राजकीय-हत्याचा आणि गुन्हेगारीचा सिलसिला...ना कधि थांबला, ना कधि थांबेल!
...राजन राजे
पृष्ठ क्र. ५



'लेखकराव' ते 'राजलेखक': भालचंद्र नेमाडे यांची वैचारिक घुसमट!
...सतीश तांबे
पृष्ठ क्र. ८

जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प ते बाळकूम 'डेटा सेंटर प्रकल्प... अनिल काकोडकरांची बनेलगिरी! ...राजन राजे
पृष्ठ क्र. ९

...तो एक 'मोहनदास गांधी' नावाचा अवलिया....

"I am not at all concerned with appearing to be consistent. In my search after Truth I have discarded many ideas and learned new things. When anybody finds any inconsistency between two writings of mine, if he has still faith in my sanity, he would do well to choose the later of the two on the same subject" (Harijan April 29 1933)


''वैचारिक सुसंगतता कायम राखण्याची मला बिलकूल पर्वा नाही! सत्याचा शोध घेताना, मी अनेक संकल्पनांचा त्याग करत आलोय आणि नवनव्या गोष्टी शिकलोय. माझ्या दोन लिखाणांमध्ये जेव्हा कुणाला काही विसंगती आढळेल; तेव्हा, त्याचा जर माझ्या शहाणपणावर विश्वास असेल...तर, एकाच विषयावरच्या दोन लिखाणांमधलं माझं नंतरच दुसरं लिखाणं स्विकारणं, त्याच्यासाठी हितकारक ठरेल.'' (हरिजन, २९ एप्रिल–१९३३)

कुठलाही आडपडदा न ठेवता, काडीमात्र अहंभाव न बाळगता असं बेधडक वक्तव्य, तिचं व्यक्ति करु शकते; जी, स्वतः तहहयात 'प्रयोगशील' राहून अनुभवातून स्वतः चुकतमाकत जीवनाचं गहन तत्त्वज्ञान शिकत आली असावी. म गांधींच्या जन्माच्या वेळी, त्यांच्या महत्ततेची कोणी भविष्यवाणी नव्हती केली; जशी श्रीकृष्ण, गौतम बुद्ध वगैरेंच्या जन्मप्रसंगी झाली होती. तळहातावरच जन्मतः चक्रवर्तीपदाची लक्षणं होती, असा चंद्रगुप्तासारखा कुठल्याही असामान्य लक्षणांनी, 'मोहनदास करमचंद गांधी' या बालकाचा तळहात भरलेला नव्हता! कुसंगती, त्यातून लहानपणी वाममार्गाला लागलेला एक मुलगा...कुणाचा आधाराला हात न घेताच, आपला अगदी सर्वसामान्य लक्षणांनी भरलेला हात कृष्णाची गीता घट्ट धरुन, जगाला पथदर्शन करण्यासाठी दीपस्तंभासारखा अस्मानात एवढा वर उंचावतो की, सगळं जागतिक–विचारविश्व, त्याच्या अस्मानी उंचीपुढे थिटं पडतं!

आजही, तोच महात्मा आणि त्याची 'गांधीवादा'ची तिचं शिकवण...युद्धजन्य जागतिक–अशांतता, जागतिक सामाजिक अस्वास्थ्य, भांडवली आर्थिक विषमता–शोषण–अन्याय–अत्याचार व त्यातून घडलेलं सजीवसृष्टीच्या मुळावर उठलेलं निसर्गाचं विध्वंसन व त्यातील भौतिक–प्रगतीच्या राक्षसी अट्टहासातून निर्माण झालेल्या प्रलयंकारी प्रदुषणाने ग्रस्त जगाला पथदर्शक ठरतेय! अस्वस्थ–अशांत जगाला वाचवू शकणारा एकमात्र जीवनदायी–संजीवक विचार म्हणजे, 'गांधीवाद' होय!

हिंसाचारातून तत्काळ आर्थिक स्वरुपाच्या व अन्य प्रकारच्या समस्या सोडवणुकीचे मार्ग दिसतीलही; पण, तो मार्ग कधिही 'शाश्वत' ठरणे नव्हे; कारण, **''हिंसाचारातून हिंसाचार आणि कुठल्या न् कुठल्या रुपात अधिकाधिक अत्याचारच अटळपणे जन्माला येतो!'' ज्या अल्बर्ट आईनस्टाईनने,''असा जिवंत हाडामांसाचा माणूस, कधिकाळी या पृथ्वीतलावर वावरत होता, यावर भविष्यातील पिढ्यांना विश्वास ठेवणं देखील कठीण जाईल'', असे उद्‌गार काढले होते; त्याच आईनस्टाईनने हिंसाचारासंदर्भात, ''हिंसाचाराकडे नीतिशून्य व्यक्ति अटळपणे आकृष्ट होतात, त्यामुळेच हिंसाचारावर आधारीत निरंकुश हुकूमशाहीत समाज नीतिभ्रष्ट होऊन आतून सडत जातो.** इतिहास गाजवलेल्या कल्याणकारी; पण, क्रूर हुकूमशहांनंतर, कायमच बदमाष सत्तेवर आलेत... हे गतकाळानं आपल्याला दाखवून दिलंय.'' असे प्रत्ययकारी उद्‌गार काढले होते.

''अनेक महापुरुषांनी त्यांच्या काळाचा पट बदलला; पण, या एका माणसानं अवघं जगच कायमचं बदललं!'' ते असामान्यत्व हेच की, त्यांनी ज्याला 'अंतिम सत्य' म्हणता यावं, असा शाश्वत स्थैर्य, सुखसमाधान व शांतिचा विचार जगाला दिला... जो कधिकाळी गौतम बुद्धाने जगाला दिला होता.



...म. गांधींनी फक्त, आम्हाला स्वातंत्र्यच मिळवून दिलं का? तसं तर, आपापल्या देशाला प्रासंगिक योगदान देणारे असंख्य महापुरुष, जगभरात आढळतातच की! मग, असं कुठलं 'असामान्यत्व' गाधींमध्ये होतं की, सगळं जग एकमुखाने म्हणू लागलं, ''अनेक महापुरुषांनी त्यांच्या काळाचा पट बदलला; पण, या एका माणसानं अवघं जगच कायमचं बदललं!'' ते असामान्यत्व हेच की, त्यांनी ज्याला 'अंतिम सत्य' म्हणता यावं, असा शाश्वत स्थैर्य, सुखसमाधान व शांतिचा विचार जगाला दिला...जो कधिकाळी गौतम बुद्धाने जगाला दिला होता. पारतंत्र्यातील धकाधकीच्या भारतीय–राजकारणाची धुरा वाहताना; त्यांना 'जीवनतत्त्वा'ची परखड मांडणी करणाऱ्या 'अष्टावक्र गीते चा स्वीकार करणं अवघड गेलं; पण, सर्वांना प्रेमाने आपल्या कवेत सामावून घेणारी, कृष्णाची महाभारतातली गीता स्विकारतानाही...महाभारतातला हिंसाचार, आपल्या प्रज्ञेनं जमेल तेवढा त्यांनी नाकारला.

१९४७च्या आसपासच्या अरुंद काळाच्या पट्ट्यात भारतासह अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली; पण, पाकिस्तानसह, अशा अनेक राष्ट्रांमधल्या 'लोकशाही–स्वातंत्र्या'चा वारंवार व वेळोवेळी निर्घृणरित्या संकोच झालेला आपल्याला दिसतो...पण, भारतात, स्वातंत्र्यापश्चात निदान सातआठ दशके तरी असं घडू शकलेलं नाही; त्याचं एकमेव कारण, म. गांधींनी आपल्याला दिलेला शाश्वत विचार व पुरवलेलं जगण्याचं नैतिक व अक्षय इंधन!

...मात्र, गेले दशकभर, वर्ष–२०१४ नंतर प्रथमच काही विपरीत, या आपल्या भारत देशात घडू पहातंय...जे आसपासच्या देशांमध्ये घडताना आपण यापूर्वीच अनुभवलंय. प्रथमच, या देशातली लोकशाही, अशा विचारसरणीच्या लोकांमुळे संकटात सापडलीय; ज्या विचारसरणीने, या निःशस्त्र व कुठल्याही संरक्षणाविना वावरणाऱ्या, युगंधर महात्म्याचा डाव साधला होता!

...तेव्हा, रात्र वैऱ्याची आहे, ''उषःकाल होता होता, काळ रात्र येऊ पहातेय; नव्हे, ती चोर पावलाने अवतरलीय... सावध व्हा!''

...राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

''सर, आम्ही पंतप्रधानांची खोटी स्तुती करणारं हे प्रोपोगंडा नाटक सादर करणार नाही !'' विद्यार्थ्यांनी ठामपणे सांगितलं आणि एकच गदारोळ माजला.

लै भन्नाट किस्सा घडला आहे वाचा

...ही घटना आहे कलकत्त्यातल्या 'स्कॉटिश चर्च कॉलेज' मधली. पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त पश्चिम बंगाल सरकारनं सरकारी कॉलेजांना 'नमो सेवा गाथा' हे नाटक रंगभूमीवर सादर करायच्या सूचना केल्या. स्क्रिप्ट व्हॉट्सपवर आली. पंतप्रधानांची एकतर्फी, भरमसाठ खोटी स्तुती करणारं नाटक. अभिनेत्यांसाठी ''एकही शब्द बदलायचा नाही.'' अशा सूचना होत्या.

विशेष म्हणजे जे प्रेक्षकांमध्ये बसणार आहेत, त्यांना अमुक डायलॉग आल्यावर ''जय श्रीराम'' आणि तमुक वाक्याला ''मोदी है तो मुमकिन है'' अशा घोषणा द्यायची सक्त ताकीद होती !

नाटक सगळ्या खोट्या घटनांनी खचाखच भरलेलं होतं. आजकाल प्रोपोगंडा सिनेमे येतात बघा..'शेकडो करोडचा बिझनेस' अशा खोट्या बातम्या पसरवल्या जातात, तसा हा प्रकार होता. मोदीजी म्हणजे जणू सुपरहीरो अशी बेगडी प्रतिमा तयार केली होती.

...जेन झी बुद्धीमान आहे. न्यूज चॅनल किंवा व्हॉट्सॲप फॉरवर्डवर पोसलेली नाही. प्रत्येक गोष्टीची फॅक्ट चेक असते त्यांच्याकडं. अभिनय करणारी पोरंपोरी म्हणाली, ''हॅट. हे खोटे आहे. आम्ही इतकं तद्दन खोटं उगाचंच उसन्या कन्व्हिक्शनने नाही बोलू शकत.'' शिक्षक म्हणाले, ''तुम्ही अभिनेते आहात, तुम्हाला जे समोर येईल ते करावे लागेल.''

ड्रामा क्लबची पोरंपोरी अस्सल जातीवंत कलाकाराच्या रक्ताची होती... सत्तेचे पाय चाटणारी नव्हती. ती म्हणाली, ''सर, आम्ही हे नाटक करू शकणार नाही. हा खोटा प्रचार आहे. लोकांची दिशाभूल आहे.'' उत्तर आलं, ''हा सरकारचा आदेश आहे.



नकार दिलात तर इंटर्नल परीक्षेच्या मार्कांवर आणि प्रोजेक्टवर परिणाम होऊ शकतो.''

...एका विद्यार्थिनीवर इतका ताण आला की तिला हॉस्पिटलमध्ये दाखल करावं लागलं. आई म्हणाली, ''घाबरू नकोस. त्यांना ठणकावून सांग, 'नाही' म्हणजे 'नाही''' पोरंपोरी भूमिकेवर ठाम राहिली. दाखवून दिलं की या कॉलेजनं देशाला बादल सरकार, मनोजमित्र, केया चक्रवर्ती यांच्यासारखे रंगकर्मी दिलेत. रंगमंच हा विचारांचा असतो, कुणा सत्ताधाऱ्यांच्या आदेशांचा मोहताज नाही. आणि त्यांनी नाटकात काम केलं नाही !

समस्त मराठी कलाकारांनो... वाचताय ना???

'अभिनेता' असा असतो !

खरा कलाकार सत्तेला जाब विचारणारा असतो.

सत्तेचे पाय चाटणारे 'भाट' म्हणजे मदाऱ्याच्या तालावर नाचणारी माकडं असतात.

'आपण कोण आहोत', हे एकदा स्वत:च्या मनाला विचारा.

...किरण माने

'...ये सारे जुल्म आपकी
प्रधानमंत्री पद के नीचे हुए है...
आप सीधे सीधे जिम्मेवार हो!''
ऐतराज....

उन्हें
जेन-जी की गालियाँ पसंद नहीं...
उन्हें पसंद हैं
सदियों से चली आती
सभ्य मुस्कानें
जिनके पीछे
छिपी रहती हैं
जातियाँ, ऊँच-नीच, स्त्री के लिए
नियम
पुरुष के लिए छूट
और धर्म के नाम पर सजा हुआ
पाखंड
दोहरे मानदंड...
वे कहते हैं
''बेटा, भाषा ठीक रखो...''
कोई उनसे पूछे
भाषा पहले बिगड़ी या समाज?
किसने सिखाया
कि अपमान को संस्कार कहा जाए
और विरोध को असभ्यता?

युवाओं की ज़ुबान पर उन्हें ऐतराज़
है
पर अपनी सदियों पुरानी गालियों
पर नहीं
जो कभी जाति बनकर निकलीं
कभी लिंग बनकर
कभी धर्म बनकर
कभी सत्ता बनकर...
वे शब्दों को कटघरे में
खड़ा करते हैं
और इतिहास चुपचाप
उनकी ओर देखकर मुसकुरा देता
है...
क्योंकि हर पीढ़ी जानती है
गाली हमेशा मुँह से नहीं निकलती
कभी-कभी पूरा समाज ही
एक गाली की तरह जीया जाता
है...

...शैलेन्द्र चौहान

'धर्मराज्य पक्षा'चा एल्गार...मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची व त्यांना तुरुंगात धाडण्याची धर्मराज्य पक्षाची मागणी!

...पृष्ठ क्र. १ वरुन

कर्णाला (ज्ञानेश कुमार) कायदा करुन 'राष्ट्रपतीं'पेक्षाही व्यापक अशी 'तहहयात' संरक्षण कवचकुंडलं बहाल केली गेलीयत... हे विसरु नका. या भाजप-संघीय सरकारने, भ्रष्टाचार निपटून काढण्याची क्षमता असणारा सामर्थ्यवान 'लोकपाल' निर्माण केला नाही आणि जो काही आज कमकुवत 'लोकपाल' मौजूद आहे...त्यालाही धड काम करायला त्यांनी वाव शिल्लक ठेवलेला नाही की, त्याला 'मजबूत' केला नाही... मजबूत कोणाला बनवलं तर, त्यांना EVM / SIR ची हेराफेरी करुन निवडणूक जिंकू देणाऱ्या निवडणूक आयुक्तांना (CEC & EC). खरंतरं, मतदार होण्यासाठी फक्त, तुम्ही देशाचा नागरिक असणं व वय वर्ष १८ पेक्षा जास्त असणं, एवढ्याच दोनच गोष्टी हव्या असताना 'सीमा खन्ना' या EC-IT महासंचालकाकरवी मनमानी अटी लादून व फॉर्म नं. ६ आणि फॉर्म नं. ७ मध्ये बेकायदेशीर बदल केले गेले आणि देशातल्या १३ कोटी मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचं कारस्थान रचलं गेलं; ज्यात, उपलब्ध माहितीनुसार मुस्लिम व समाजाच्या तळागाळातील SC/ST वगैरे प्रजातीच्या आणि Gen-Z चा मोठ्याप्रमाणावर समावेश आहे... ज्याप्रमाणे, सध्या देशाच्या राजकीय-पटलावर 'वन नेशन, वन इलेक्शन' किंवा बहुराष्ट्रीय-कॉर्पोरेट क्षेत्रात AI सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने 'वन कंपनी' घोषणा राबवून 'कर लो दुनिया मुठ्ठी में' धर्तीवर मुठभरांच्या हातात सत्ता केंद्रीत करुन (Totalitarianism OR Hyper-centralisation) उर्वरित बहुसंख्यांकांना, आपल्या तालावर गरजेनुसार हवं तसं नाचवण्याचा व 'गुलाम' बनवण्याचा गोरख धंदा सुरु आहे... तसाच, तो सीमा खन्ना या महामायेने निवडणूक-आयुक्तालयात बेलगाम सुरु केलाय (EC)...साध्या धोब्याने चारित्र्याविषयी शंका घेताच, रामाने प्राणप्रिय सीतेचा त्याग केला होता... आणि इथे तर, लाखो-करोडो लोकं, EVM आणि SIR बद्दल 'साशंक' असतानाही अयोध्येत राममंदिर उभारणारे 'जय श्रीरामवाले' तथाकथित रामभक्त...ना 'EVM' सोडायला तयार आहेत, ना 'SIR' थांबवायला तयार... यातच सगळं काही आलं.. तेव्हा, आपली 'लोकशाही' ही पारदर्शक 'व्होटिंगशाही' नसून; EVM / SIR द्वारा मतांचा 'झोल' करणारी 'झोटिंगशाही'च झालेली आहे; म्हणूनच EVM हटवा / SIR थांबवा...स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताक वाचवा'', असे राजन राजे यांनी अंति कळकळीचं आवाहन केलं.

या आंदोलनात काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. विवेक कोरडे, ठाणे शहराध्यक्ष श्री. राहुल पिंगळे, सरचिटणीस श्री. महेंद्र म्हात्रे, काँग्रेस नेत्या सौ. कल्पनाजी हजारे, ॲड. प्रभाकर थोरात, जावेदभाई, जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वयचे संजय मं. गो., आंबेडकरवादी विचारवंत आनंदा होवाळ, समाजमान्य नेते ॲड. नाना अहिरे, म्युनिसिपल कामगार नेते जगदीशजी खैरालिया, ठाणे मतदाता जागरण अभियानचे उन्मेषजी बागवे वगैरे प्रभृतींनी, ''लोकशाहीची विश्वासार्हता, केवळ निवडणुका घेण्यावर नसून, निवडणूक प्रक्रिया निःपक्ष, पारदर्शक आणि जनतेच्या विश्वासास पात्र असण्यावर अवलंबून आहे. घटनात्मक संस्थांच्या कारभाराबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण होत असतील, तर त्यांची पारदर्शक तातडीने पद्धतीने चौकशी होणे आवश्यक आहे आणि संबंधित निवडणूक-आयोगातील आजीमाजी धेंडांवर कडक कारवाई व्हायला हवी आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या नरेंद्र मोदी व अमित शहांनी राजीनामा द्यायला हवा...राज्यघटना आणि लोकशाही मूल्यांचे जतन व संरक्षण करण्यासाठी आता, जनतेलाच रस्त्यावर उतरण्याखेरीज गत्यंतर नाही,'' अशी भूमिका आपापल्या शब्दात मांडली.

जंगल उजाड करून पर्यावरणपूरक विकास?

महाराष्ट्रात पाण्याची टंचाई निर्माण झाली, धरणांतील पाणीसाठा कमी झाला, शेतीवर संकट आले आणि पिण्याच्या पाण्यासाठी माणसांना वणवण करावी लागली, की सरकारला जलसंधारण, वृक्षारोपण आणि पर्यावरणसंरक्षणाची आठवण होते. पण दुसरीकडे विकासाच्या नावाखाली हिरवीगार जंगले तोडली जातात तेव्हा मात्र सरकार झोपेचे सोंग घेत असते. भीमाशंकरसारख्या जैवविविधतेने समृद्ध परिसरातील जंगलावर वीजप्रकल्पासाठी घाव घातला जात आहे, म्हणून प्रश्न फक्त काही झाडांच्या कत्तलीचा नाही. प्रश्न आहे तो विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश करण्याच्या सरकारी मानसिकतेचा आणि अशा विनाशालाच पर्यावरणपूरक ठरवण्याच्या राजकीय निर्ढावलेपणाचा! महाराष्ट्रातील पावसाचे चक्र, वाढती उष्णता, अनियमित पर्जन्यमान, पाण्याची टंचाई आणि जंगलांचा ऱ्हास या समस्या एकमेकांशी निगडित आहेत. गेल्या वर्षी अतिवृष्टी झाली म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ पडला होता आणि या वर्षी एल निनोमुळे एक तृतीयांशही पाऊस झाला नाही म्हणून सर्वत्र सुका दुष्काळ पडलाय. अशा परिस्थितीत भीमाशंकरच्या परिसरातील जंगलतोडीचा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. संबंधित प्रकल्पासाठी किती जंगलक्षेत्र बाधित होणार आहे, ३२००० आकडा सांगण्यात आलेला असला तरी त्यापेक्षा कितीतरी अधिक झाडे तोडली जाणार आहेत ती नेमकी किती, पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास काय सांगतो, वन्यजीवांच्या अधिवासावर त्याचा काय परिणाम होणार आहे आणि पर्यायी जागांचा विचार झाला आहे का? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे सरकारने दिली पाहिजेत. प्रकल्पाला पर्यावरणविषयक आवश्यक त्या परवानग्या एवढ्या झटपट कशा मिळाल्या, याचीही सार्वजनिक तपासणी झाली पाहिजे. या मागील राजकारणाचे गौडबंगाल शोधले पाहिजे. केवळ प्रकल्पाला पर्यावरणपूरक म्हटले म्हणजे तो प्रकल्प पर्यावरणपूरक ठरत नाही. दाव्याची सत्यता पुराव्यांनी सिद्ध करावी लागते.

२०१४ पूर्वी राज्य वन्यजीव मंडळासमोर प्रस्ताव आला की त्यावर सखोल चर्चा व्हायची. बैठकीची तारीख आणि विषयपत्रिका आठ दिवस आधी सदस्यांना दिली जायची. चर्चेनंतर प्रत्यक्ष जागेची पाहणी करूनच मंजुरीचा निर्णय घेतला जायचा. आता बैठका अवघ्या २४ तासांच्या मुदतीत ठरतात. विषयपत्रिका आयत्यावेळी दिली जाते आणि तातडीने मंजुरी देण्याचा आग्रह नव्हे, तर जणू आदेशच दिला जातो. पूर्वी प्रस्तावातील प्रत्येक बाब तपासली जायची; आता पर्यावरणाची हानी भरून काढण्याचे उपाय वाचून वेळ न दवडता मंजुरी द्या, असा दबाव येतो. कायदे तेच आणि कडक आहेत; बदलली आहे ती या भाजप सरकारची अंमलबजावणी करण्याची पद्धत. पर्यावरणसंरक्षणाच्या प्रक्रियेला मंजुरीच्या औपचारिकतेत रूपांतरित करणे, हाच या बदलाचा खरा अर्थ आहे. यावर प्रश्न उपस्थित केले की 'खोटे कथानक' रचल्याचा आरोप केला जातो. उलट फडणवीसच रेटून खोटे बोलत हा प्रकल्प पर्यावरणपूरक कसा आहे याची महती गात आहेत. जंगल वाचवण्याची मागणी खोटी कशी, याचे उत्तर देण्याऐवजी विरोधकांना अराजकतावादी, दिमागी नक्षलवादी किंवा देशद्रोही ठरवायचे आणि सत्ताधाऱ्यांच्या समर्थकांनी समाजमाध्यमांवर त्यांच्यावर तुटून पडायचे, हा सोपा मार्ग! पण बदनामीच्या या गदारोळात मूळ प्रश्न सुटत नाहीत. स्वच्छ वीज निर्माण करण्यासाठी स्वच्छ हवेचा बळी कशासाठी? जंगलतोडीशिवाय विकास शक्यच नाही, हा अट्टहास कशासाठी? विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा विनाश होत असेल, तर त्यावर प्रश्न विचारणे हे खोटे कथानक नसून लोकशाहीतील आवश्यक कर्तव्य आहे.

जुन्या जंगलातील जैवविविधतेची गुंतागुंतीची साखळी कृत्रिमरीत्या पुन्हा उभी करणे जवळजवळ अशक्य आहे. गडचिरोलीतील वृक्षतोडीनंतर तीन कोटी झाडे लावण्याच्या घोषणेचे काय झाले? राज्यात गाजावाजा करून लावलेल्या ३३ कोटी झाडांचे पुढे काय झाले? घोषणांचा हिशेब कोण देणार? हवाई सर्वेक्षणात दिसणारी हिरवाई म्हणजे समृद्ध जंगल नव्हे. झाडांची संख्या मोजता



येते; पण जंगलातील जैवविविधता, नैसर्गिक अधिवास आणि पर्यावरणीय साखळीची जागा तितक्याच झाडांनी भरून निघत नाही. हे वास्तव सांगणाऱ्यालाच मूर्ख ठरवले जात असेल, तर समस्या पर्यावरणाविषयीच्या अज्ञानापुरती मर्यादित नाही; ती सत्तेच्या विकासविषयक दृष्टिकोनात आणि प्रश्न विचारणाऱ्यांना गप्प करण्याच्या वृत्तीतही आहे. भीमाशंकरच्या जंगलाच्या निमित्ताने हेच विदारक वास्तव समोर येत आहे.

या ठिकाणी शिवाजी राजांनी ४०० वर्षांपूर्वी जंगलांचे महत्त्व कसे जाणले होते, ते त्यांच्या आज्ञापत्रावरून दिसून येते. त्या आज्ञापत्रातील मजकूर असा आहे – 'आरमारास तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते. ते आपले राज्यांत आरण्यामध्ये सागवनादी वृक्ष आहेत त्याचे जे आनकूल पडेल ते हुजूर लेहून हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. या विरहित जे लागेल ते पर मुलकीहून खरेदी करून आणवीत. **स्वराज्यातील आंबे, फणस आदी करून हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची परंतु त्यास हात लाऊ न द्यावे. काये म्हणून की; ही झाडे वर्षा दो वर्षानी होतात यैसे नांही. रयतेने ही झांडे लाऊन लेंकरासारखी बहूत काल जतन करून वाढविली; ती झाडें तोडिली यावरी त्याचे दुःखास पारावार काये? येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारास हीत स्वल्पकालेच बुडोन नाहीसेंच होते. किंबहुना धण्याचेच पदरी प्रज्यापिडणाचा दोष पडतो. या वृक्षाच्या अभावे हानीही होते. या करितां हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित यखादें झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेलें आसे तरी त्याचे धण्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे तोडून न्यावे.' उठताबसता शिवाजी राजांचे नाव घेऊन राज्य करणाऱ्या फडणवीसांना अशा वेळी शिवाजी राजांचे सोयीस्करित्या विस्मरण होते. असो.**

वीज निर्माण करणारा जलविद्युत प्रकल्प आणि पर्यावरणाला हानी न पोहोचवणारा प्रकल्प या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. विजेची गरज निर्विवाद आहे. उद्योग, शेती, घरे, रुग्णालये आणि सार्वजनिक सेवा यांना वीज लागतेच. पण वीजेची गरज असल्यामुळे प्रत्येक प्रकल्पासाठी कोणत्याही जंगलाचा बळी देणे योग्य ठरत नाही. प्रकल्पाचा उद्देश कितीही महत्त्वाचा असला, तरी त्याची जागा पर्यावरणीय किंमत देऊन भरत नसते. विकासाचा फायदा कोणाला मिळणार आणि त्याची पर्यावरणीय किंमत कोणाला मोजावी लागणार, हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. वीजप्रकल्पामुळे जंगल नष्ट होत असेल, तर संपूर्ण प्रकल्पाचे पर्यावरणीय मूल्यमापन केले पाहिजे. जंगलतोडीची भरपाई म्हणून दुसरीकडे झाडे लावण्याची घोषणा केली, तरी मूळ जंगलाची जागा तितक्याच सहजपणे भरून निघत नाही. शेकडो वर्षांत विकसित झालेली जैवविविधता, जमिनीची रचना, स्थानिक सूक्ष्म हवामान, जलचक्र आणि वन्यजीवांचे अधिवास यांची पुनर्निर्मिती काही रोपटी लावून लगेच करता येत नाही. जंगलाने पर्यावरणाला दिलेल्या सर्व सेवांचे मोजमाप कोण करणार?

जंगल म्हणजे लाकूड, इंधन किंवा जमिनीचा एखादा तुकडा एवढेच नसते. ते पाण्याच्या ...पृष्ठ क्र. ११ वर

''विजू नाटेकर ते प्रदीप पूर्णेकर'', ठाण्यातील राजकीय-हत्यांचा आणि गुन्हेगारीचा सिलसिला...ना कधि थांबला, ना कधि थांबेल!

''We, the citizens of Thane....''

गेल्या चारपाच दशकांच्या राजकीय कालखंडातच ठाणे शहर, हे विविध धंदे–व्यवसाय करणाऱ्या गुर्जर धनदांडग्यांना हळूहळू निश्चितपणे 'आंदण' दिलं जाऊ लागलं होतं आणि त्यासोबतच, ठाण्याचा काँक्रिटीकरणाद्वारे विकृत विकास होत, ''खाडी–विहीरी–तलावांचं व चराऊ कुरणे–बगीच्यांचं व प्रामुख्याने आगरी–कोळ्यांचं शहर'' असलेल्या ठाण्याची हिरवाई नष्ट होत गेली, निसर्ग–पर्यावरण उध्वस्त होत गेलं. पुढे ती प्रक्रिया अधिक गतिमान होतं आणि त्यातून जैन–गुजराथी–मारवाड्यांनी ठाणे शहरातल्या जवळपास सगळ्या मोक्याच्या जागांचा आपल्या बेफाम अर्थबळावर आसुरी 'कब्जा' केला. उदा. साधारण चार दशकांपूर्वी, टेंभीनाक्याच्या देवीच्या उत्सवाला ठाण्यातील नागरिक स्टोअर्सने प्रथमच लाखाची देणगी देऊन सुरुवात करुन दिली होती...तिथूनच पुढे निव्वळ मतांची बेगमी करण्यासाठी, स्थानिक राजकारण्यांनी राबवलेल्या ठाण्यातील 'उत्सवी राजकीय–उरुसा'ला, आर्थिक–पाठबळ देणारे गुज्जू धनदांडगे, 'दाते' (देणगीबहाद्दर) बनून पुढे आले... ठाण्यात, पुढे यथावकाश, या 'दात्यां'चे खरे 'दात'ही दिसले आणि त्यांची 'जमात'ही दिसली, दिसत राहिली...ठाण्याचा 'काळा इतिहास' त्याचा दुर्दैवी साक्षीदार आहे!

मराठी राजकीय नेत्यांच्या टक्केवारीच्या व दलालीच्या राजकारणाने, हे सोन्यासारखं मूळ मराठी शहर, धनिक जैन–गुजराथी–मारवाड्यांच्या ताब्यात हळूहळू जात गेलं... आपल्या नेत्यांवर (आजही) आंधळा विश्वास ठेवणाऱ्या, याच भोळ्याभाबड्या कफल्लक मराठी–तरुणाईला ठाण्यात साधा आसरा शोधणं देखील, कठीण होऊन बसलं... आणि, त्यातून ते आधी गुन्हेगारी, खंडणीबहाद्दरी व नंतर वैफल्यग्रस्ततेतून अंमली–पदार्थांच्या नशेबाजीकडे वळले... ''उडत्या पंजाब'सारखं झपाट्याने 'उडतं ठाणं' होऊ लागलं!''

जसजशी काँक्रिटच्या इमारतींची संख्या व उंची, ठाणे शहरात वाढत गेली...तसतशी गुन्हेगारी व राजकीय–दहशत, या शहरात भयानक वेगाने वाढत गेली...हा सगळा रक्तरंजित खेळ, प्रामुख्याने स्क्वेअर फुटामागे येणाऱ्या 'मोठ्या पैशा'चाच! शहरातल्या गुन्हेगारीची पाळेमुळे स्थानिकांमध्ये केवळ खोलवर रुजलेलीच आहेत किंवा असतात, असं नव्हे; तर, त्याचे धागेदोरे किती वरपर्यंत पोहोचलेले असतात; ते आम्हाला अनेक प्रसंगी दृग्गोचर झालेलं असलं; तरीही, एक ज्वलंत उदाहरण मुद्दाम नमूद करतो (ज्याचं सूचोवाच, मी ९ ऑक्टोबरच्या 'भयमुक्त ठाणे'च्या मोर्चात भाषण करताना केलं होतं). माझा उजवा हात म्हणून गणला गेलेला सहकारी, विक्रांत कर्णिकांवर २५ जून–२०११ रोजी, ठाणे शहरातल्याच एका लोकप्रतिनिधीने दोन रिक्षांमधून चॉपरधारी गुंड पाठवून प्राणघातक हल्ला केला होता. शहराच्या सद्सद्विवेक बुद्धीचा राखणदार (Conscious-Keeper) असलेल्या निधड्या छातीच्या विक्रांतची सुविद्य पत्नी वर्षा, हिचे वडील कै. आत्माराम सावंत, हे तत्कालीन 'मुंबई सकाळ'चे संपादक असल्याने, त्यांची तत्कालीन केंद्रीय कृषीमंत्री शरद पवारांशी घनिष्ट मैत्री होती व एकमेकांच्या घरी येणंजाणं होतं.... वर्षाविहिनींना शरद पवारांनी अंगाखांद्यावर खेळवलेलं... आणि, म्हणूनच महाराष्ट्रात शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे व काँग्रेसचे सरकार असल्याने, त्यांनी आपल्या पतीवरील हल्लेखोरांचा तातडीने छडा लावण्यासाठी 'पवारकाकां'ना स्वतः पत्र लिहीले. लागलीच शरद पवारांनी, तिला हल्लेखोरांना पकडून कायद्यानुसार कडक शासन करण्याचं पत्रातून लेखी अभिवचन देखील दिलं...त्याचा तत्काळ परिणाम होऊन पोलिस तपासाची चक्र वेगाने फिरुन हल्लेखोरांपर्यंत पोलिस पोहोचलेदेखील; पण तोपर्यंत, उशीर झाला होता. शरद



पवारांना, त्या हल्ल्याचा 'सूत्रधार' असलेल्या अधम, खुनीवृत्तीच्या गुंड ठाणेकर लोकप्रतिनिधीने (जो लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्याआधी, एका कुख्यात गुंडटोळीतला गुंड होता) विक्रांत कर्णिक, हा एक सामाजिक–कार्यकर्ता (Activist) असून, आपल्या भांडवली–व्यवस्थेविरोधात (Anti Establishment) सतत आवाज उठवणाऱ्या नेत्याचा (म्हणजे, मी स्वतः) जवळचा सहकारी असल्याचं कळवलं...लागलीच शरदरावांनी तो तपास, पोलिसांना बासनात गुंडाळून ठेवायला सांगितलं...हा सारा घटनाक्रम, नौपाडा पोलिस ठाण्यातीलच एका पोलिस अधिकाऱ्याने मला तेव्हा कळवला होता (ज्याच्या, पुतण्याला मी पोटाला लावलं होतं)...आजतागायत, त्या गुन्हेगारांपर्यंत ठाणे–पोलिस कधि पोहोचू शकलेले नाहीत; दरम्यान, विक्रांत कर्णिकांचा कर्करोगाने काही वर्षांपूर्वी मृत्यू होऊन गेलाय.

...याचा अर्थ एकच, तो म्हणजे शहरात होणाऱ्या राजकीय हत्येसारख्या गंभीर गुन्ह्यांचे धागेदोरे थेट मंत्रालयापर्यंत पोहोचलेले असतात...आणि, शहरात 'माफियाराज' चालवणाऱ्या 'आका'च्या व 'आका'च्या मंत्रालयातील 'राजकीय बापा'च्या (God Father) सहभागाविना वा किमानपक्षी, त्याच्या संमतीविना, अशा गुन्हेगारी घटना घडूच शकत नाहीत! ...लक्षात ठेवा, तेव्हा ठाण्यातील एकही राजकारणी वा स्थानिक लोकप्रतिनिधीने, विक्रांत कर्णिकांवर प्राणघातक हल्ला झाल्यानंतर त्यांना वा त्यांच्या कुटुंबियांना साधी भेटण्याचीही हिंमत दाखवली नव्हती...स्वाभाविकच, ''काळ सोकावत गेला''!

''निवडणुकीपुरत्या 'लाडक्या बहिणी' असणाऱ्यांपैकी..अशा न थांबणाऱ्या खूनसत्रातून अजून किती बहिणी 'विधवा' होऊ द्यायच्या...???''

...मुंबई–नवी मुंबईच्या वेशीवर असलेल्या ठाण्यात आजवर वन–डे क्रिकेटसारखी राजकीय खुनांनी, किती शतकं झळकवलीयत ते, पोलिस–दफ्तरीची नोंदच सांगेल. लक्षणीय बाब म्हणजे, पोलिसांनी जिथून ''सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'' हे आपलं ब्रीदवाक्य घेतलंय, त्या 'श्रीमद्भागवतावर' किंवा त्या ब्रीदवाक्याशी साधर्म्य सांगणारं ''परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्'' हे श्रीकृष्णाचं मौलिक–अमोघ उच्चारण असणाऱ्या 'श्रीमद्भगवद्गीतेवर' हात ठेऊन सांगावं की, ''त्यातले, किती खुनी गुन्हेगार, आतापर्यंत फासावर गेलेत किंवा आजन्म तुरुंगात सडलेत...असे शेकडो खून पडल्यानंतरही?''

...हेच ते, बड्या राजकीय धेंडांचे (Master Minds), आपापले राजकीय वा आर्थिक लागेबांधे सुरक्षित राखण्याकामीचं व आपली राजकीय–गुन्हेगारी दहशत कायम राखण्याकामीचं, पडद्यामागचं षडयंत्री 'व्यवस्थापन'... ज्यातून, अशा खुनांची मालिका अखंडीत चालू रहात आलीय.

व्यक्तिगत आलतूफालतू कामं झटपट करणाऱ्या आणि 'बिनमहत्त्वा'चे झगमगते सार्वजनिक खेळमहोत्सव, सत्यनारायण–गणेशोत्सव–दहीहंड्या–गरबे दिवाळीमहोत्सव–भंडारे (ज्यातून, अनेक राजकीय–कार्यकर्त्यांचा प्रपंच व राजकारण चालत आलंय) वगैरे करणाऱ्या राजकारण्यांच्या 'पलटणी' तयार करण्याचा 'पॅटर्न', खऱ्याअर्थाने ठाण्यातच प्रथम रंगला आणि मग, तो पुढे अवघा महाराष्ट्र नासवत,

महाराष्ट्रभरात पुढे सरकला!

शहरातल्या मूळ 'मायमराठी' स्थानिकांच्या खऱ्याखुऱ्या विकासासाठी आणि सुरक्षिततेसाठी किती आस्था आजवर दाखवली गेली? या शहरातली वाहतूक-व्यवस्था, कायदासुव्यस्था, सार्वजनिक आरोग्यसेवा, शिक्षणसेवा इ. केव्हाचीच कोलमडलेली आहे...आणि, खासगीकरणातून महागडी होत गेलेली इस्पितळे व महागड्या इंग्रजी शाळांमुळे... सर्वसामान्य मराठी-माणसांची शहरात प्रचंड लूट व कोंडी सुरु आहे. मराठी-शाळांच्या 'ठरवून केल्या गेलेल्या' दीर्घकाळच्या दुरवस्थेमुळे पालकांच्या खिशाला सहजी परवडणारं व अंति हितकारक असणारं असं, मातृभाषेतून आपल्या मुलांना शिक्षण देणं, दुरापास्त बनलं. बरं, निव्वळ कसत्या जमिनी विकून, आलेल्या औटघटकेच्या श्रीमंतीने, एखादा स्थानिक समाज पुढारतो, पुढे जातो...असा कुणाचा गैरसमज आहे की, काय? जगात अनेक ठिकाणी शहरं विकसित होताना, ती मूळ स्थानिकांच्या 'कायमस्वरुपी' सर्वंकष-विकासासाठी, विकास पावणाऱ्या शहरांच्या एकूण आर्थिक-उलाढालीतून 'विशिष्ट टक्केवारी'चं (अगदी एखाद टक्का ती असली, तरी खूप झाली) अत्यंत पारदर्शक, कार्यक्षम व भ्रष्टाचारमुक्त पद्धतीने 'व्यवस्थापन' करती झालीत...त्यातूनच, स्थानिकांच्या भविष्यातल्या पिढ्यापिढ्यांचा खरा सांस्कृतिक-आर्थिक व शैक्षणिक विकास होऊ शकतो. ठाणे शहराचे प्रामुख्याने मूळ मालक असलेल्या आगरी-कोळी भूमिपुत्रांचा असा विकास करण्याचा प्रयत्न तर, सोडाच; त्याचा साधा विचार तरी, कधि झाल्याचा कुठला दाखला आहे आपल्याकडे? मात्र, दुसरीकडे आमच्या स्थानिक आणि 'ठाण्याबाहेरुन' आलेल्या नेतेमंडळींचा अचंबित करणारा 'आर्थिक-विकास' होत गेला; आणि, पाहता पाहता ते शेकडो-हजारो कोटीत खेळायला लागले... ज्या मोठ्या पैशावर खरा हक्क, सर्वसामान्य स्थानिकांचा असायला हवा होता.

...लक्षात घ्या, हा अधम स्वार्थयुक्त 'कार्यभाग' साधण्यासाठीच... राजकारण्यांच्या अशा झटपट व अचाट राजकीय-आर्थिक विकासाला नडणाऱ्यांच्या, व्यवस्थित 'ठरवून' लालरक्ताच्या 'होळ्या' प्रसंगोपात्त पेटवल्या जात आल्यात, पेटवल्या जात रहातील!

हातच्या कंकणाला आरशाची गरज काय... जशी भाताची परीक्षा साध्या शिताने होते; तशीच ''नेत्याची परीक्षा, तो ज्या समाज वा समाजघटकाचं नेतृत्त्व करतो; त्याच्या एकूण स्थितीवरुन होते!''

कुठलाही समाज किंवा समाजाचा घटक, जेव्हा काळाच्या ओघात मागे पडलेला दिसतो; तेव्हा, त्या समाजाचे वा समाजघटकाचे, स्वतःचे काही दुर्गुणही त्याला मोठ्याप्रमाणावर कारणीभूत असतात... हे जेवढं खरं, तेवढंच त्यांच्या नेतृत्त्वाने, प्रयत्नपूर्वक व प्रचंड मेहनतीने झोकून देऊन ते दोष, ते दुर्गुण दूर करायचे असतात! आमच्या ठाण्यातील आगरी-कोळी भूमिपुत्रांसाठी अशी समर्पणाची भावना, कुणा नेत्याने बाळगल्याचं अंशतः तरी कधि कुणाला जाणवलंय? ...त्याचीच, कटू-विषारी फळं हा भूमिपूत्र-समाज आज दुर्दैवाने भोगतोय. आपल्या संसाधनहीन व बेताच्या पूर्वीच्या परिस्थितीतही, ''सुखी माणसाचा सदरा सापडलेला'', हा निसर्गात रमणारा, खाडी-समुद्र किनारी पिढ्यानपिढ्या वावरणारा आगरी-कोळी समाज, आज बहुतांश देशोधडीला लागण्याचं प्रमुख कारण, त्यांचं आत्मकेंद्रित, लघुदृष्टीचं व आत्यंतिक स्वार्थी-घराणेबाज असलेलं नेतृत्त्व! त्याचीच फलनिष्पत्ती म्हणून हातातून मासेमारीची जाळी, होडीची वल्ही आणि भातशेतीतले नांगर व मिठाची आगरे बळजबरीने वा कपटी वृत्तीने हिसकावून घेतला गेलेला हा आगरी-कोळी भूमिपुत्रांचा समाज, जमिनी विकून ''क्षणाचा राव व अनंतकाळचा रंक'' बनलेला, दिशाहीन अवस्थेत फिरताना बव्हंशी दिसतोय.

ज्या होडीशी वा बोटीशी दर्या-खाडीचा 'राजा' असलेल्या आगरी-कोळी समाजाचा 'जैवबंध' जोडलेला आहे; त्याचेच उदाहरण देत ('Ship of State' analogy), सॉक्रेटीस तीन हजार वर्षांपूर्वी सांगून गेलाय की, ''वादळी वाऱ्यात होडी वल्हवणं किंवा बोट चालवणं, हे जसं त्या कामात पारंगत, निष्णात असलेल्या दर्यावर्दी माणसाचं काम; तसंच, समाजाचा गाडा हाकणं, हे कुशल सारथ्याचं काम होय...समाजाचा नेता, हा 'पालकत्वा'च्या (Guardian) समर्पित भावनेनं काम करणारी सक्षम, प्रामाणिक व्यक्ती असली पाहिजे. तिला खाजगी संपत्ती, दागदागिने, मालमत्ता धारण करण्याचा अधिकार असता कामा नये; मात्र, त्या व्यक्तिच्या सर्वसामान्य भौतिक गरजा भागवण्याची जबाबदारी समाजाने घेतली पाहीजे, जेणेकरुन त्याच्यात भ्रष्टाचाराची प्रवृत्ती निर्माण होणार नाही.'' आणि, इथे तर आम्ही, जेवढा नेता जास्त धनराशीत लोळत असेल, मालमत्तेत रमलेला असेल आणि त्यातला, थोडासा अंश (तो ही चांगला मोठा पैसा असतो) जो निवडणुकीत आपल्याला रोख रक्कम, दारू, मटण, साडीचोळी, सार्वजनिक-मंडळाला देणगी वगैरे रुपाने वाटत असेल...त्यालाच निवडून देतो आणि नको त्याला नेमका सत्ताधीश बनवतो... कुकर्मही आपलंच आणि त्यातून उद्भवलेलं दुर्भाग्यही आपलंच!

''कॉर्पोरेटीय व्यवस्था व राजकीय-व्यवस्था'', या एकाच नाण्याच्या दोन अभिन्न बाजू असतात. कॉर्पोरेट्समध्ये जसे, संवेदनशून्य व एक प्रकारच्या मानसिक-विकृतीची (Psychopaths) लागण झालेली लोकं, व्यवस्थापक म्हणून अधिकाधिक उच्चपदावर पोहोचताना दिसतात; अगदी तोच डिट्टो प्रकार, राजकारणात प्रतिबिंबित होत असतो... जेवढा, राजकारणी उलट्या काळजाचा, लुटेरा, गेंड्याच्या कातडीचा आणि खुनी वृत्तीचा.. तेवढा तेवढा तो राजकारणात सरसर वर चढत जातो! राजकारण्यांना निदान निवडणुकांना तरी सामोरं जावं लागतं; या कॉर्पोरेटीय धेंडांना तर, निवडणुकीला कधिही तोंड द्यावे लागत नाही; फक्त, नेमणूक करणाऱ्यांचीच पर्वा त्यांना करत रहावी लागत असल्याने, ते राजकारण्यांपेक्षाही अधिकचा पाताळयंत्री व अधम कारभार करतात.

कॉर्पोरेटीय-कारभार जसा, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने मुठभरांच्या तालावर, निव्वळ नफ्याच्या राशी वाढवण्यासाठी बेगुमान चालवला जातो; तसाच, सध्या 'कंपनी-कारभार' सदृश, राजकारणी कारभार चालताना दिसतो...त्यात, सामान्यांचा विचार अभावानेच असतो; पण, त्यांच्यावर अन्याय-अत्याचाराचा प्रहार, मात्र दैनंदिन जगण्याची सामान्य बाब असते. तेव्हा, तथाकथित 'लाडक्या बहिणीं'नी, आता राजकारण्यांनी आपली मतं घेता घेता, आपल्या धन्याने अन्याय-अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला म्हणून आपल्या मंगळसूत्राला तर हात घातला जाणार नाही ना, याचा गंभीर विचार करण्याची वेळ आलीय!

...जोपर्यंत, आपला सगळा समाज... पैशाला, गरजेपेक्षा अधिक 'सन्मान' देणं आणि 'सलाम' करणं थांबवत नाही; तोपर्यंत, या हत्या व ही दहशत थांबणार नाही!

गुन्हेगारी, हा ठाण्यातील राजकारणाचा अत्यावश्यक व अविभाज्य भाग बनण्याच्या, घृणास्पद घटनाक्रमालाही पाचसहा दशके उलटून गेलीत... ''नाटेकर ते पूर्णेकर व्हाया, जमील शेख'', असा तो रक्तरंजित-निर्घृण प्रवास आहे!

आपल्या मराठी लोकांची पण कमाल आहे; आपण देवाला पण 'राजा' म्हणतो (उदा. लालबागचा किंवा गणेशगल्लीचा 'राजा') आणि उठसूठ राडा करणाऱ्या नामचीन गुंडांना पण म्हणतो 'राजा'!

...केवळ अनियंत्रित 'भाईगिरी'मुळेच नव्हे; तर, अनेक अनर्थांमुळे 'Thane is a Dying City''...काँक्रिटच्या उंचच उंच गगनचुंबी ठोकळ्यांमध्ये आणि रस्त्यावरच्या वहातूक-कोंडीमध्ये, श्वास गुदरमरलेलं असं; जर, भारतातलं कुठलं एकमेव शहर असेल; तर, ते आहे 'ठाणे' शहर... एक सुन्न झालेलं, जीव मुठीत धरुन जगणारं शहर, म्हणजे ठाणे-शहर; ज्याच्या, रंध्रारंध्रांतून घाण, पू, सडलेलं रक्त बाहेर पडत असतं.

...तरीही, ठाण्यातले बडे बडे गुंडपुंड राजकारणी व महापालिकेतले अधिकारी, रोज उठून ६०-६५ मजली नव्या बांधकामांच्या योजना आखतातच आहेत आणि त्यातून अतिप्रचंड पैसा ओरपतातच आहेत. त्यात, आता मोठी भर पडलीय ती, SRA आणि क्लस्टर-विकासाची. जोडीला ३०-३५ वर्षातच जीर्ण होत चाललेल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा आयता 'लोण्याचा गोळा', गुंडपुंड राजकारण्यांना सतत खुणावत असतोच.

'काँक्रिटच्या विकासा'च्या नावाखाली हिरव्याकंच ठाण्याची, सगळी हिरवाई नष्ट झाली...'तलावांचं शहर', असं अभिमानाने मिरवणाऱ्या ठाणे-शहरातले बहुतेक तलाव नाहिसे झाले वा आक्रसले, विहीरी बुजल्या, खाड्या कायमस्वरुपी प्रदूषित झाल्या...रस्ते-वहातुकीची दुर्दशा, अस्वच्छतेचं आगर, पिण्याच्या पाण्याचं दुर्भिक्ष्य व टँकर-लॉबीकडून सततचा लुटीचा जाच...एक ना अनेक, 'अनर्थ' घडत गेले आणि आजचा 'विकास', हा भविष्यातला 'विनाश' आहे...याचं साद्यंत उदाहरण म्हणून, 'ठाणे-शहर' सामोरं येऊ लागलं.

५०-६० वर्षांपूर्वी ''सारस्वतांचं असलेलं हे 'सुसंस्कृत' शहर...पहाता पहाता 'विकासा'च्या नावाखाली भाई, मर्मवीर, धर्मवीर, कर्मवीर, दादा, अण्णा, साहेब वगैरे वगैरे गुंड टोळ्या पोसून दादागिरी करणाऱ्या असंख्य स्थानिक-राजकारण्यांच्या कृपाशिर्वादाने रासवटांचं शहर बनलं'' (मध्यंतरी, ठाण्यातील नामचीन गुन्हेगारांसोबत, तत्कालीन मुख्यमंत्री-पालकमंत्री एकनाथराव शिंदे यांचे लागलेले मोठमोठे बॅनर्स, 'धर्मराज्य पक्षा'ने आवाज उठवल्यानंतरच पटापट उतरवण्यात आले होते)...आणि, शहरात हातपाय पसरुन बसलेल्या गुन्हेगारांमुळे शहराच्या मूळ निवासींना... 'दहशतीचा कहर' बनत चाललेलं हे 'ठाणे-शहर', निमूटपणे पहाण्याखेरीज काही करता येणं, अशक्यप्राय बनत गेलं; कारण, त्यांच्या कराच्या पैशातून त्यांच्या संरक्षणासाठी अस्तित्वात असलेली 'खाकीवर्दी'रुपी कवचकुंडलं, बड्या राजकारण्यांच्या आणि धनदांडग्यांच्या दारी, केव्हाचीच 'गहाण' पडली होती...विजू नाटेकर, जमील शेख, प्रदीप पूर्णेकर, विक्रांत कर्णिकांसारखे सामाजिक-राजकीय कार्यकर्ते, सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले प्राण गहाण टाकत असतानाचे, हे विषण्ण करणारं चित्र आहे!

ठाणे शहराबाहेरुन आलेल्या नवश्रीमंत उच्चशिक्षित नोकरदारवर्गाकडून किंवा व्यावसायिकांकडून बांधकाम-उद्योगातल्या बक्कळ नफ्याचा, आपल्या हातचा मोठा 'सक्शन पंप' कार्यप्रवण ठेऊन त्यांचा पैसा खेचणं, खेचत रहाणं...यावर, ठाणे-शहराचं अवघं राजकीय अर्थकारण

आधारलेलं आहे. त्यातच, शहरातल्या बिल्डर-राजकारण्यांचं प्रचंड फावलं; ते ठाण्यासारख्या एकाच शहरात गेली काही दशके, अख्खा भारत (विशेषतः गुजराथ, यूपी आणि बिहार) फार वेगाने ओतला जात राहिल्याने! त्यामुळे, कुठल्याही ठाण्यातील नूतन पंचतारांकित बागेत, गगनचुंबी इमारतीत (टॉवर्स), मोठमोठे चकचकीत मॉलटॉल्समध्ये गेलं तर, अभावानेच तिथे 'मराठी शब्द' कानावर पडतील आणि जे कुणी 'मायमराठी' दिसतील, ते एकतर सरकारी-अधिकारी असतील किंवा स्थानिक राजकारणी (मतितार्थ, 'सूज्ञास सांगणे न लगे')! साधी मराठमोळी माणसं दृष्टीस पडतील, ती १०′ × १०′च्या शहराच्या परीघाबाहेरील विविध नगरांच्या कोंडवाड्यांमध्ये.

परिणामतः, शहरात कुणाचा पायपोस कुणाच्यात राहिलेला नाही...एकाच शहरात, वेगवेगळ्या उपग्रहावर रहात असल्यासारखी विभिन्न भाषिक-सांस्कृतिक माणसं, एकमेकाशी 'मला काय त्याचं', या संवेदनशून्य भावनेनं फटकून रहातात; त्याचा, या बिल्डर-राजकारण्यांना चांगलाच फायदा होत आलाय...कारण, एखाद्या शहरी दैनंदिन समस्येविरुद्ध (मग, ती गुन्हेगारीची असो वा नागरीसुविधांबाबतची असो) स्थानिक जनतेकडून, एकत्रित मोठा व दीर्घकालीन उठाव होणं व संबंधित राजकारण्यांविरुद्ध निवडणुकीत प्रतिकूल मतदान होणं, जवळपास अशक्यप्राय बनलं.

नाशिक, वर्धा, डोंबिवली, साताऱ्यापासून महाराष्ट्राच्याच नव्हे; तर, संपूर्ण भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या खुनशी वृत्तीच्या राजकारण्यांनी शहराचा पूर्ण ताबा घेतला... 'बांधकाम-उद्योग' आणि त्यातून साधकबाधक मार्गाने होणारी कल्पनातीत मोठी कमाई, सगळ्याच राजकारण्यांची व महापालिका अधिकाऱ्यांची, एक हुकमी 'लाईफलाईन' बनून गेली...आणि, त्यातूनच, स्खलनशील वृत्तीच्या ठाणे-पोलिसदलावरील, या अभद्र सोनेरी-टोळीची (गोल्डन-सिंडीकेट) अवांछनीय हुकूमत बेफाम वाढत गेली.

''राजकारणी, एकवेळ चोर-दरोडेखोर असला तरी चालतो (बहुतांशी ते असतातच); पण, तो 'बिल्डर' वा बांधकाम-उद्योगाचा थेट 'लाभार्थी' (छुपा भागीदार वगैरे) असता कामा नये....''

महाराष्ट्रात मुंबई-लालबागच्या 'कृष्णा देसाई', या धडाडीच्या कामगार-नेत्याची हत्या झाली आणि तिथून मुंबई-महाराष्ट्रातला लालबावटा आणि त्याचबरोबर डावी-चळवळ थंडावली... कामगारांमधून बिनीचे राजकीय कार्यकर्ते होण्याच्या प्रक्रियेत खंड पडला, तो आजतागायत! राजकारणातला एक जिताजागता-जाणकार, संघर्षरत 'समाजघटक' किंवा राष्ट्रीय-संपत्तीचा 'निर्माता'...या नात्याने वावरणारा 'कामगारवर्ग', झपाट्याने 'दिशाहीन' होत, वृत्तीने शब्दशः 'हीन' होत गेला. व्यसनाधीनता, क्षुद्र स्वार्थ किंवा भयगंडापोटी...फुटीरता, बेईमानी आणि गद्दारी वरचेवर करत रहाण्यातून, उरलीसुरली कामगार-चळवळ अस्तंगताला जात गेली. मराठी-कामगार, मग तो उरलासुरला 'कायम' कामगार असो वा 'कंत्राटी-गुलाम' असो; तो एवढ्या अवनतीला गेला की, आपल्याला सुळावर चढवणाऱ्यांना उद्देशून 'येशू ख्रिस्त' जे म्हणाला होता; तेच तो आज पुन्हा जिवंत झाला तर, आजच्या कामगारवर्गाला उद्देशून म्हणेल, ''ते काय करताहेत, हे त्यांच त्यांनाच कळत नाहीय!''

...त्यातच, अत्यंत बेजबाबदार व निव्वळ अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी, वाटेल त्या थराला जाणारे 'उत्तरभारतीय लोंढे' कामगारक्षेत्रात, मायमराठ्यांना दुशा देत मोठ्याप्रमाणावर घुसत गेले...आणि, मग, कामगार-चळवळीच्या दृष्टीने, उरलंसुरलं सगळंच संपलं!

...आणि, त्याचसोबत, राजकारण कामगारवर्गाच्या हातून निसटून, भांडवलदारवर्गाच्या व प्रामुख्याने, बिल्डर-लॉबीच्या हातात गेलं...भांडवलदार पडद्याआडून; तर, बिल्डर-लॉबी थेट छाती पुढे काढून राजकारणाचा कब्जा घेऊन बसली!

'दहशतवादा'चा रोग तसा, ठाण्यासाठी फार जुना आहे; जोपर्यंत, तुम्ही त्यापासून 'अस्पर्श' असता किंवा प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या त्याचे 'लाभार्थी' असता; तोपर्यंत, तुम्ही त्यावर अवाक्षर न काढता, एकप्रकारे त्याचे समर्थनच करत असता, करत रहाता....पक्ष-कार्यालयांतून वा संघटित गुंडगिरीतून चालणारी 'घटनाबाह्य न्यायालये' अथवा वाटली जाणारी कंत्राटे...ही मूळ गुन्हेगारीची सुरुवात होय; 'ग्यानबाची मेख' तिच आहे! त्याच्या फार खोलात न जाता, एवढंच म्हणता येईल की, हे दोनतीन पिढ्यांचं पाप आहे... पुढच्या पिढ्यांना ते धुवून काढावं लागेल; जसं, सध्या CJPच्या 'अभिजीत दिपके, आशुतोष रांका, सौरभ दास'सह CPI(ML) कम्युनिस्ट पक्षाच्या 'AISA'ची 'नेहा बोरा'... ही 'Gen-Z' नवतरुणाई, मोठ्या राजकीय कॅनव्हासवर, ते महत्कार्य पार पाडताना दिसतेय.

...मुद्दा, आज SRA आणि क्लस्टर-विकासाचा... जोडीला ३०-३५ वर्षातच जीर्ण होत चाललेल्या जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा! थोडं थबकून जरा विचार व्हायला हवा की, आज आपण फुकटात घरं देण्याच्या नावाखाली गगनचुंबी 'टॉवर्स' बांधत चाललोत; पण, भविष्यात काय याच गतीने पुढे 'आयफेल टॉवर्स' बांधणार आहोत की, 'बुर्ज खलिफा'...??? या अतिरेकी काँक्रीट-बांधकामांतून गुंतागुंतीच्या अनेक नागरी-समस्या उद्भवतील व एकूणच शहरी-गुन्हेगारीत अनिर्बंध वाढ होत जाईल, ते वेगळेच; पण, सामान्य नागरिकांच्या मासिक-उत्पन्नात महागाईच्या दराशी मेळ खाणारी वाढ होत नसताना...कितीकाळ ही मूळ मायमराठी माणसं, महागड्या होत जाणाऱ्या ठाण्यासारख्या शहरांमध्ये टिकून रहाणार आहेत? आताच, सर्वत्र मोठ्याप्रमाणावर फुकटात घरं व त्यात भर म्हणून, सवलतीच्या दरात वाढीव चटईक्षेत्र मिळाल्यानंतर, या सामान्य आर्थिक-स्थितीतल्या मराठ्यांचं शहरातून दूर दूर पलायन सुरु आहे...आणि, हेच नेमकं 'बिल्डर-लॉबी'ने वर्चस्व मिळवलेल्या राजकीय-प्रशासकीय व्यवस्थेला (म्हणजेच, 'भांडवली-व्यवस्थे'ला) हवं असतं. ''सहन होत नाही आणि सांगता येत नाही'', असा हा एकप्रकारचा सर्वसामान्यांच्या आत्म्यावरचा बलात्कारच... पण, त्याला आक्रोशाचा करुण ध्वनी नाही की, आक्रंदनाची हलवून सोडणारी स्पंदनं नाहीत, एवढंच! कारण, वरकरणी कुठे जबरदस्ती झाल्याचं दृष्टोत्पत्तीस येत नाही...सगळा मामला वरवर बेमालूमपणे मिळवलेल्या संमतीचा असतो ना?

हे असंच चालू ठेवत, बहुतांश मूळ निवासींकडून यथावकाश शहरं रिकामी केली जावीत व उपटसुंभ 'स्मार्ट' (स्मार्ट म्हणजे, सुशिक्षित पण, आत्यंतिक स्वार्थी) लोकं, शहराचे 'स्वामी' व्हावेत... अशी एकूणच सामान्यांच्या जगण्यातलं 'स्थैर्य', कायमचं हिरावून घेणारी 'भांडवली-संरचना' आहे; पण, सांगायचं कुणाला आणि ऐकणार कोण?

सिंगापूरमध्ये तळागाळातील लोकांसाठी, त्यांच्या मासिक-मिळकतीच्या जेमतेम एक ते दोन टक्क्यांपर्यंत घरभाडे असलेली छोटी घरं, तेथील सरकार उपलब्ध करुन देतं; तसेच, त्यापेक्षा अधिक चांगल्या आर्थिक-स्थितीतील जवळपास ८०% जनतेसाठी ९९ वर्षांच्या करारावर (Lease) सरकार घरांची मालकी बहाल करतं; ज्यातून, खाजगी व सुसंघटित बिल्डर-लॉबीच्या अतिरेकी नफेखोरीला व गुन्हेगारी-दहशतीला चांगलाच चाप बसतो. न्यूयॉर्कचे महापौर म्हणून जोहरान ममदानी, याच मुद्द्यावर निवडून आलेत...सध्या फ्रान्समध्ये जी सर्वसामान्यांसाठी 'घरटंचाई'सदृश विस्फोटक स्थिती झालीय; तशी होऊ द्यायचीय?

''अन्न, वस्त्र, निवारा'', या तीन मूलभूत गरजांपैकी एक असलेल्या गृहबांधणीकडे आपण, अल्पावधीत भरपूर परतावा देणारी 'गुंतवणूक' म्हणून पाहू लागलो...साठेबाजी व काळ्या बाजाराचं महापातक 'बिल्डरशाही'तून आपल्याकडे व्हायला लागलं. ''मूलभूत-गरजेचा म्हणजेच, मूलभूत-अधिकाराचा, बक्कळ नफा देणारा एक असा 'उद्योग' बनवला गेला की, ज्यात गुन्हेगारी व खुनाखुनीचा चंचूप्रवेश अपरिहार्यपणे आलाच!''

घरांचा 'काळाबाजार' (Black Market) सुरु झाला. त्यातूनच पुढे घरांच्या किंमती आकाशाला भिडण्यास सुरुवात झाली. एखादा प्रकल्प सुरु झालं की, गरज असणाऱ्यांपेक्षा 'गुंतवणूक' म्हणून फ्लॅट घेणाऱ्यांचीच संख्या जास्त व्हायला लागली.

अमानुष स्वरुपाच्या 'आर्थिक-विषमते'तून ''माणसांना घरं नाहीत आणि घरांना माणसं नाहीत'', असं व्यस्त-विपरीत समीकरण, तयार होऊ लागलं. कालांतराने, गृहबांधणी, हा एक फार मोठा किफायतशीर, करचोरी सहजी रिचवणारा आणि राजकीय-दहशत व राजकीय-प्रभावाच्या आधारे कुणालाही सहजी करता येणारा प्रमुख 'उद्योग-व्यवसाय' बनत गेला. सोन्यापेक्षाही बरकत आणणारी 'एक गुंतवणूक' किंवा 'रोज सोन्याचं अंड देणारी कोंबडी' म्हणून, त्याकडे पाहण्यास सुरुवात झाली. ''काळ्या पैशा'ने कूस बदलली... खतरनाक गुन्हेगारीशी पाट लावून तो हिरेमाणके, सोनं, शेअर्स, चलनी-नोटांपेक्षा 'काँक्रिट'च्या भक्कम आश्रयाने वस्ती ठोकून राहू लागला!''

आज देशभर आणि जगातसुद्धा या धनदांडग्या-मुजोर 'शेठजी-संस्कृति'ची चलती आहे; पण, त्याची सुरुवात गुजराथमध्ये नव्हे...तर, दुर्दैवानं, तुमच्याआमच्या महाराष्ट्रात झाली; ती, आमच्या घराणेबाज, खंडणी आणि टक्केवारी वसूल करणाऱ्या मराठी-राजकारण्यांचा हात धरुनच. 'महालक्ष्मी' तर शेठजींकडे आधीपासून पाणी भरतच होती; पण, आता 'राजलक्ष्मी' ही त्यांच्याशी शय्यासोबत करु लागली; असं हे सगळचं अंतिमतः, मराठी-माणसाला सर्वनाशाकडे आणि अखंड गुलामगिरीकडे नेणारं आहे!

...म्हणूनच, किमान आतातरी देवादिकांमध्ये, धर्मसंप्रदायांमध्ये व फाजील-उत्सवप्रियतेत पूर्णतया अडकलेल्या व हताश-वैफल्यग्रस्त झालेल्या सामान्य मराठी-माणसाला... 'धर्मराज्य पक्षा'च्या शहरं-उपनगरांतून प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे जास्तीतजास्त 'एक दुकान, एक मकान' या धोरणाचं क्रांतिकारी महत्त्व पटावं! मराठी-माणसाच्या जगण्याची कोंडी फोडणाऱ्या, या 'संपत्तीचं फेरवाटप' करण्याच्या धोरणाकडे, जर मराठी-माणूस दुर्लक्ष करेल; तर, स्वतःच्या हाताने आपल्या पुढील पिढ्यांच्या भविष्याची राखरांगोळी करुन ठेवेल. मग, त्या राख-रांगोळीच्या रेखाटनातूनच भविष्यातील मराठी-दिवाळ्या, त्याला साजऱ्या कराव्या लागतील; कारण, दिवसागणिक 'महाग' होत जाणाऱ्या 'शहरांनी व शहरातल्या घरांनी', आपलं 'दिवाळं' तेव्हा वाजवलेलं असेल...जेव्हा, लक्ष्मीपूजनाला बाहेर, धनदांडग्या गुज्जूंचे कानठळ्या बसवणारे फटाके वाजत असतील!

...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

‘पूर्वी देशात खेड्यातील न्हावीही प्लास्टिक सर्जरी करायचे’, ‘हिंदू रिसर्च फाउंडेशन’चा पुरस्कार स्वीकारताना ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांचा दावा

ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी नागपूर येथील एका कार्यक्रमात प्राचीन भारतातील प्रगतीवर भाष्य करताना खेड्यातील न्हावीदेखील पूर्वी प्लास्टिक सर्जरी करायचे, असा दावा केला आहे.

‘‘देशाचे दुर्दैव असे की, आपण वर्तमानाच्या मागे लागलो आणि भूतकाळ विसरलो. जितके आपण भूतकाळापासून दूर जाऊ, तितके आपले वाईट दिवस येतील. पूर्वी भारत इतका प्रगत होता की, खेड्यातील न्हावीही प्लास्टिक सर्जरी करायचे. ओठ बाहेर आले असतील तर ते नीट करणे, दातांची रचना सुधारणे, अशी कामेही न्हावी करायचे,’’ असा दावा ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी केला. ‘हिंदू रिसर्च फाउंडेशन’तर्फे प्रदान करण्यात आलेला महर्षी वाल्मिकी पुरस्कार स्वीकारल्यानंतर ते बोलत होते.

फाउंडेशनच्या ‘सप्तर्षी पुरस्कारां’अंतर्गत यंदाचा महर्षी वाल्मिकी पुरस्कार नेमाडे यांना प्रदान करण्यात आला. भारताचा गौरव त्याच्या भूतकाळातील कामगिरीमुळे आहे. त्यामुळे भूतकाळाचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. देशाचा वर्तमान चांगला नसल्याचे सांगत त्याकडे लक्ष देण्याऐवजी भूतकाळातील चांगल्या गोष्टी समजून घेऊन त्या पुढे आणल्या पाहिजेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

‘प्रत्येक क्षेत्रात भारतीयांचे योगदान’

‘‘देशात प्रत्येक क्षेत्रात काम करणारे लोक होते. त्यांनी कोणतेही क्षेत्र वगळले नव्हते. शून्याचा शोध लागला नसता, तर जगाची प्रगती झाली नसती. शरीरशास्त्र, आत्मा आणि शरीर यांविषयीचे ज्ञानही आपल्याकडे होते. भारतात दोन हजार वर्षांपूर्वीपासून स्त्रिया लेखन करत होत्या. इंग्रजी लेखिका त्यानंतरच्या काळात आल्या. त्यामुळे इंग्रजांनी आपल्याला शहाणपण शिकवू नये,’’ असे नेमाडे म्हणाले.


‘‘आपण अनेक गोष्टी मानतो. आपल्याकडे एक धर्मग्रंथ नाही. प्रत्येकाने आपापले मानायचे. बौद्ध, शीख, आदिवासी यांचे वेगळे ग्रंथ आहेत, त्यांचे वेगळे हिंदुत्व आहे. तेही महत्त्वाचे आहे. आपण सर्वांनी मानले पाहिजे. एक असे काही नाही, सगळ्यांचे सगळे मानले पाहिजे; तेव्हा हा देश मोठा होईल,’’ असेही ते म्हणाले.

‘हिंदुत्वाचा अर्थ केवळ गोधरापुरता मर्यादित नाही’

हिंदू या शब्दाला संकुचित आणि नकारात्मक अर्थ प्राप्त झाला असून तो बदलण्याची गरज आहे, असेही नेमाडे यांनी सांगितले. अफगाणिस्तान, नेपाळ, भूतान आणि चीनमधील लोकांशीही आपले सांस्कृतिक नाते असल्याचे त्यांनी नमूद केले. जगातील अनेक देशांतील लोकांना रामायण आदर्श वाटते, असेही ते म्हणाले.

‘‘हिंदुत्व म्हटले की गोधराची आठवण होते; मात्र हिंदुत्वाचा अर्थ केवळ एवढाच नाही. सर्वांना जवळ घेणारे आणि दूरच्या देशांनाही जोडणारे हिंदुत्व आहे. पुढील पिढीला हिंदुत्वाचा खरा अर्थ समजावून सांगण्याची गरज आहे. साहित्याच्या माध्यमातून हा व्यापक विचार रुजवला पाहिजे,’’ असे आवाहन नेमाडे यांनी केले.

(मूळ स्रोत ‘‘लोकसत्ता, २५ ऑक्टोबर २०२६’’)



नेमाडे आणि पुरोगामी

श्री. चं.प्र. देशपांडे यांनी नेमाडेंच्या कवितेमधील विसंगती दाखवून देताना नेमाडेंचे चहाते पुरोगामी वतुर्ळातले आहेत असे विधान केले त्याचे आश्चर्य वाटले.

आश्चर्य, चं. प्र. देशपांडे यांच्या विधानाचे वाटले नाही. कारण त्यांनी ‘दुःखाचा अंकुश राहो मनावर’ या ओळीतील आणि पूरोगामीपणाच्या मूल्यांमधील विसंगती अचूक हेरली आहे. आश्चर्य याचे वाटले की पुरोगामी म्हणवणारे काही नेमाडेंच्या कच्छपी लागले आहेत. कारण नेमाडेंचे पुरोगामीत्व किती बेगडी आहे हे डॉक्टर रावसाहेब कसबे यांनी पूर्वी विस्तृतपणे उलगडून दाखवले आहेच. तसेच ‘हिंदू’ प्रसिद्ध झाल्या झाल्या ‘परिवर्तनाचा वाटसरू’ या मासिकाने हिंदू वरती एक परिसंवाद घेतला होता त्या परिसंवादातही हिंदू कादंबरीची सखोल चिकित्सा झाली होती.

नेमाडे एका अशा समाज गटाचे प्रतिनिधित्व करतात की जो नवशहरी आहे आणि शहरात स्थलांतरित होऊनही शहराचा वैश्विक मानवतावाद नाकारतो आहे. आपल्या खेडूतपणाचा त्याला जाणीवपूर्वक गर्व आहे. पुणे, मुंबई आणि भारतात इतर मोठ्या शहरांमध्ये स्वतःच्या व्यक्तिगत प्रगतीसाठी स्थलांतरित होऊन, तिथे आपली सामाजिक अस्मिता व ओळख शून्य आहे हे ध्यानात आल्यावर साहित्य आणि कलांमधून आपल्या खेडूत, प्रतिगामी, मठ्ठ व असहिष्णू लकबी प्रथा, आठवणी, निसर्ग, खाद्यपदार्थ, लोककला, लोककथा, लोकगीते यांचे भांडवल करून शहरातल्या परांगदा लोकांपेक्षा आपण अधिक एतद्देशीय आहोत. आपली मुळे खोलवर रुजली आहेत असा दावा केला जातो. साहित्याबाहेरील स्थलांतरितांकडून, ‘चुलीवरील चहा, मटण’, स्थानिक खाद्य संस्कृती वगैरेंचा बाजार ...पृष्ठ क्र. १० वर

‘लेखकराव’ ते ‘राजलेखक’: भालचंद्र नेमाडे यांची वैचारिक घुसमट!

बंडखोरीची सुगी समजल्या जाणाऱ्या जवानीत रा. रा. भालचंद्र नेमाडे यांनी लिहिलेला ‘लेखकाचा जेव्हा लेखकराव होतो’ हा प्रसिद्धी, प्रतिष्ठा, पैसा वगैरेंमुळे लेखकाचे होणारे अधःपतन अधोरेखित करणारा लेख चांगलाच गाजला होता.

पण **नेमाडे यांनी आपल्या कादंबऱ्यांच्या व्यतिरिक्त जे साहित्यकारण सुरू केले आणि साहित्याला समाजशास्त्राच्या गोठ्यात नेऊन बांधले, त्यामध्ये त्यांना संस्कृती आणि परंपरा यांची भलामण करणे गरजेचे वाटू लागले. यामुळे त्यांना अनुयायांचा लोंढा मिळाला आणि ‘नेमाडपंथ’ ही संज्ञा उदयाला आली.**

मग साहित्यातील ठाकरे आणि शरद पवार ह्यांचा मेळ शोभावेत अशी भाषणे करणारे नेमाडे, हशा आणि टाळ्यांच्या नादी लागून लेखकाचे लेखकरावच नव्हे, तर त्याही पुढे जाऊन लेखकराज बनत आता राजलेखक बनायच्या वाटेवर आहेत, असे त्यांचे कालचे भाषण वाचून अनेकांचा ग्रह झाला आहे.

वास्तविक पाहता नेमाडे यांच्या मांडणीत हिंदुत्ववादी राजकारणाला साधक-बाधक अनेक गोष्टी असतात. पण साधक गोष्टींचा राजकारणासाठी वापर करणाऱ्यांकडे जसा फौजफाटा आहे, तसा बाधक गोष्टींसाठी नाही. ...पृष्ठ क्र. ११ वर

जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प ते बाळकूम 'डेटा सेंटर प्रकल्प'...अनिल काकोडकरांची बनेलगिरी!

जैतापूर अणुऊर्जेचे एक 'हितसंबंधी' समर्थक राजा पटवर्धन लिखित 'जैतापूरचे अणुमंथन' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. अनिल काकोडकर पान क्र.११ वर म्हणाले होते, ''एका विशिष्ट मर्यादेखाली, आण्विक-विविकरणाचे स्वास्थ्यविषयक धोके संभवत नाहीत''... तर, पान क्र.१३ वरील त्यांचं वाक्ताडन होतं, ''...तसे पाहिले तर, जैतापूर प्रकल्पाची जागा सर्वदृष्टींनी आदर्श ठरावी.''

...जेव्हा, आंतराष्ट्रीय-मानके आणि चक्रवर्ती-समितीच्या निर्देशानुसार, भूभ्रंशापासून ५ कि. मी. च्या त्रिज्येत अणुभट्टीचं बांधकाम करताच कामा नये. शिवाय, वर्ष-२००२च्या चतुर्वेदी-समितीच्या अहवालानुसार, माडबनच्या सड्यातूनच भूभ्रंश (भूकवचातील भेग...Fault Line) जाते; याव्यतिरिक्त, प्रकल्प-स्थळापासून ५ कि. मी. अंतराच्या आत, आणखी दोन भूभ्रंश असताना...या तथाकथित अणुशास्त्रज्ञ महाशयांनी, वरील धक्कादायक व धोकादायक प्रतिपादन केलेलं दिसतं. १९८५ ते २००५ या वीस वर्षांच्या कालावधीत, याच प्रकल्पस्थळाला मध्यम व मोठ्या स्वरुपाचे एकूण ९३ भूकंपाचे धक्के बसल्याची सरकार-दफ्तरी नोंद आहे.

''His master's voice'' असलेले काकोडकर, सरड्यासारखे रंग बदलत निर्मम-व्यवस्थेच्या पाशवी बळावर... निसर्ग-पर्यावरणाला विपरीत व 'व्यवस्थे'च्या सोयीची अशी आपली मतं मांडताना, कायम दृष्टोत्पत्तीस आलेले आहेत.

...फक्त, ''अणुवीजेच्या प्रत्यक्ष उत्पादनाच्या प्रक्रियेत कार्बन-ऊत्सर्जन होत नसल्याने; अणुवीज, ही स्वच्छ व पर्यावरणस्नेही असल्याचा'', धादांत खोटा व आम जनतेच्या डोळ्यात धूळफेक करणारा दावा...NPCILचे तत्कालीन प्रमुख म्हणून ते करत होते. प्रत्यक्षात, ज्वलनशील दगडी कोळसा, तेल व वायू हे अणुइंधनाच्या तुलनेत सहजी उपलब्ध होतात. परंतु, भंजनशील अणुइंधन मिळवणे व त्यातून, पुढे वीज बनवणे व त्यात अनुस्यूत असलेले इतर आनुषंगिक टप्पे, हे अनेक 'ऊर्जाग्राही वा ऊर्जासघन' प्रक्रियांद्वारेच साध्य होण्याजोगे असतात. युरेनियमच्या खाणीपासून प्रारंभ केला; तर, अत्यल्प मात्रा असलेल्या या युरेनियम मूलद्रव्यासंदर्भातल्या उत्खननापासून अ) खनिज दळणे ब) केक बनवणे क) इंधन समृद्ध करणे (Enrichment) ड) वहातूक करणे इ) अणुभट्टी व तिचा गाभा बांधणे ई) वापरलेल्या अणुइंधनावर पुनर्प्रक्रिया करणे उ) अणुकचऱ्याची व यथावकाश अणुभट्टीची विल्हेवाट लावणे...अशा अनेक क्लिष्ट टप्प्यांवर, प्रचंड 'कार्बन-ऊत्सर्जन' करणारी खनिज-ऊर्जाच वापरली जाते. वर्ष-२००५ मधील युरोपियन संसदेच्या डॉ. स्टॉर्म व डॉ. स्मिथ यांच्या सखोल अभ्यासातून, सर्वसाधारण दर्जाचे युरेनियम खनिज वापरल्यास...त्यातून अणुवीज मिळवताना होणारे 'कार्बन-ऊत्सर्जन', खनिज-इंधनातून वीज मिळवताना होणाऱ्या कार्बन-ऊत्सर्जनाएवढेच जवळपास असते, हे निर्विवाद सिद्ध झालंय.

साध्या ५५० मेगावॅट क्षमतेच्या तारापूर-अणुप्रकल्प परिसरात आण्विक-विविकरणाचा (Atomic Radiation) परिणाम म्हणून रक्तक्षय, हाडे ठिसूळ होणे, अपस्मार, कायमस्वरुपी अंग व डोकेदुखी, कापरे भरणे इ. इतर अनेकोनेक व्याधी व शारीरिक विकृतींसह, अनेकांच्या अंगावर उठलेले 'कोड'सदृश चमकणारे लोकांच्या चेहऱ्यावरचे डाग, प्रत्यक्ष तो परिसर पिंजून काढताना आम्ही पाहिलेले आहेत (जे सहजी दिसू शकणारं आण्विक-विविकरणजन्य 'कोड', मिस्टर का'कोड'करांच्या अधू नजरेला कधि दिसू शकलं नाही)... आणि, त्यावरच बेतलेली, 'HIGH POWER'', ही जनजागृती करणारी प्रत्ययकारी चित्रफीत (Documentary) आम्ही जीव धोक्यात घालून तेव्हा बनवली होती.

सरकारी 'अणुऊर्जा-धोरणा'चा पुरस्कार करताना; तेव्हा, नवोन्मेषाने पुढे येऊ पहाणाऱ्या 'सौरऊर्जा-संकल्पने'वर एकच टीकेची झोड, काकोडकर वारंवार उठवत होते व ''अणुऊर्जा, ही कशी अधिक किफायतशीर, स्वच्छ व सोयीची ऊर्जा आहे''... हे जनमानसात दामटून रुजवण्यासाठी अगदी घोटून घोटून सांगत होते...पण, त्यानंतर, जसं सरकारने त्यांना 'सौरऊर्जा-मोहिमे'चं (Solar Mission) प्रचारक बनवलं; तसं, 'बनावट हिंदुत्वा'चं गरळ ओकणाऱ्या व धर्मविद्वेषाचा विखार पसरवणाऱ्या 'संघीय-प्रचारका'सारखे (नरेंद्र मोदी, हे त्याचं अस्खलित उदाहरण) अणुतज्ज्ञ डॉक्टरसाहेब, 'अबाऊट टर्न' करत अणूऊर्जेला मागे टाकून सौरऊर्जेची नको तेवढी भलामण करत सुटले.

...बरं, काही वर्षांपूर्वी हे सद्गृहस्थ ठाण्यात, रामभाऊ म्हाळगी व्याख्यानमालेत भाषण करण्यासाठी आले; तेच कार्बाईनधारी अंगरक्षकाच्या कोंडाळ्यात, इतःपर ठीक... पण, 'काकदृष्टी' अशी की, आम्हाला प्रेक्षकांमध्ये अणुऊर्जेविरोधात 'शास्त्रीय-सत्यकथन' करणारी पत्रके वाटताना पहाताच...भाषणापश्चात, प्रेक्षकांना प्रश्न विचारण्याला पूर्ण बंदी घालूनच त्यांनी भाषणाचा प्रारंभ व इतिश्री केली (इथेही, एकाही पत्रकाराच्या प्रश्नाला उत्तर न देणाऱ्या, नरेंद्र मोदींच्याच पावलावर 'काकोडकरी' पाऊल ठेवणं झालं म्हणायचं); अशी ही एकूणच, 'कोकोडकरी-काकवृत्ती'ची, सक्षेपानं रंजक कहाणी!

...तेव्हा, त्यांच्याकडून प्रस्तावित बाळकुममधील 'डेटा सेंटर' प्रकल्पविषयक तज्ज्ञ-समिती अध्यक्ष म्हणून, काय अहवाल येईल...याचा आगाऊ अंदाज वाचकांनी व संबंधितांनी बांधावा, म्हणून हा सगळा लेखनप्रपंच; जेणेकरुन, आशाळभूतासारखी समितीच्या अहवालावर नजर लावून कुणी बसायचे आणि पदरी, जगभरातल्या सुविद्य व जाणकार-जागृत जनतेनं लाथाडलेल्या 'डेटा सेंटर'चे निखारे पडून, त्यांचा अवसानघात व्हायचा...धन्यवाद!

...राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
(संकलन सहाय्य ॲड. गिरीश राऊत, आयोजक : भारतीय जीवन व पृथ्वीरक्षण चळवळ)





नेमाडे आणि पुरोगामी

...पृष्ठ क्र. ८ वरून

चालूच असतो. हा प्रयत्न मूलतः छद्मी व अप्रामाणिक आहे.

तसे तर शहरातील प्रत्येकजण मुळात खेडूतच असतो. शहरात कोणीही मुलनिवासी नसतो. परंतु शहरे वसली, वाढली हा आधुनिकीकरणाचा महत्त्वाचा भाग होता. म्हणून तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शहरात चला असे सुचवले. मूळ जातीय वांशीक प्रादेशिक ओळखी लोप पावतील व शहरामध्ये नव्या जगाचे नागरिक म्हणून एकच ओळख सर्वांना मिळेल अशी शहरीकरणाकडून अपेक्षा आहे.

मूळ पारंपारिक समाजातील ओळखी गैरलागू होतात याचाच परिणाम म्हणजे उपरे असल्याची जाणीव. शहरातील सर्वच जण सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या उपरे असतात. त्यांना फक्त आर्थिक व कायदेशीर संवैधानिक,करारात्म कओळखी असतात. कामगार / व्यावसायिक / मालक / नागरिक अशा बिनचेहऱ्याच्या त्या ओळखी असतात. १९६० च्या दशकापर्यंत शहर हे केंद्र असलेल्या प्रगतीच्या प्रारूपाचे आपल्याकडे स्वागत झाले त्यामधून येणाऱ्या विश्वबंधुत्वाच्या संस्कृतीचे प्रथा परंपरांपासून मुक्ततेचे, मानवी स्वातंत्र्याचे व समतेचे कौतुक करणारे आश्वासक साहित्य लिहिले गेले. मर्ढे करांपासून पुढे या जगण्यामधील विद्रुपता, परात्मभाव, शोषण, गांजलेपण, क्षूद्रत्व या गोष्टींची दखल घेतली गेली. बिनीचे दलित साहित्य व कामगार साहित्य आणि मध्यमवर्गीय भणंगपणा दाखवणारे श्री. ना. पेंडसे, खानोलकर, तेंडुलकर, भाऊ पाध्ये, मनोहर शहाणे, मधू साबणे, चं.प्र. देशपांडे, मनोहर ओक प्रभुतींचे साहित्य यांनी प्रगतीच्या दाव्यांमधील फोलपणा दाखवायला सुरुवात केली.

१९६० च्या दशकात व त्यानंतर २० एक वर्ष महाराष्ट्रात तीन विद्रोही चळवळी उभ्या राहिल्या कामगार लढ्यापेक्षा त्या वेगळ्या होत्या. कामगार लढा आधुनिकतेमधील विसंगती शोषण विषमता दाखवणारा होता तर या नंतरच्या तिन्ही चळवळी पारंपारिक समाजामध्ये लादली गेलेली बंधने, गौणपणा भेदभाव नाकारण्यासाठी होत्या. म्हणजेच या आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या चळवळी होत्या. रूढी परंपरांचा त्याग करू इच्छिणाऱ्या चळवळी होत्या. पहिली शेतमजूर व आदिवासींची दुसरी दलितांची व तिसरी स्त्रियांची, अशा या चळवळी होत्या. या तीन चळवळींनी अस्मिता नावाचे नवे हत्यार उपसले ही अस्मिता पारंपारिक समाजामध्ये दाबली गेलेली अस्मिता होती. ती पारंपारिक समाजातील एक ओळख नव्हती. तर पारंपारिक समाजास नाकारणारी अस्मिता होती. या चळवळी तुलनेने प्रामाणिक व काही सत्व आणि आशय असणाऱ्या होत्या.

या चळवळींचा आणि अस्मिता या नवीन राजकीय संज्ञेचा वापर करून काही बोगस अस्मिता चळवळी देखील उभारल्या गेल्या त्यात प्रामुख्याने खेडेगावातील सधन तालेवर मध्यम वर्ग आणि शहरातील नुकताच स्थलांतरित झालेला नवश्रीमंत वर्ग सहभागी झाला. अस्मितेच्या चळवळींनी उदारमतवाद, मानवतावाद, निधर्मी घटनात्मक राष्ट्रवाद, कल्याणकारी राज्य, मिश्र अर्थव्यवस्था, प्रातिनिधीक लोकशाही या मूल्यांवर सीमांत व परिघाबाहेरच्या समाज गटांच्या परिप्रेक्ष्यातून कठोर टीका केली आणि ही मूल्ये कशी पोकळ आहेत हे दाखवले. या पोकळीचा फायदा उचलला तो प्रामुख्याने ओबीसी जातींचे अस्मितावादी राजकारण आणि हिंदुत्ववादी राजकारणाने. या लोकांनी अस्मिता या हत्याराचा अर्थच बदलला त्यांच्यासाठी अस्मिता पारंपारिक ओळखींचा जागर करणारी होती. ती प्रभुत्वधारी गटांची अस्मिता होती. ती आधुनिकतेमुळे प्राप्त झालेली नवी अस्मिता नव्हती.याचवेळी आलेल्या खाऊजा धोरणांमुळे सशक्त झालेल्या देशी व परदेशी भांडवलदारांबरोबर हात मिळवणी करून जातीय व धार्मिकअस्मितावादी गटांनी राजकारणाचा नूर व रोख मुलतः बदलला.

नेमाडेसारख्यांचा एतद्देशीयवाद आणि उजवा नवहिंदुत्ववाद, या मुळापासून अप्रामाणिक विचारधारा ही या नव-वसाहतवादी व नव-उदारमतवादी भांडवलशाहीची सांस्कृतिक ओळख होती. हा देशीवाद आणि गणेश देवींचा देशीवाद यांच्यामध्ये फरक आहे गणेश देवींचा देशीवाद प्रामुख्याने भाषिक अस्तित्वासाठी आहे, तर नेमाडेंचा सांस्कृतिक सत्ता वाचवण्यासाठी. म्हणून नेमाडे गावगाड्याचे समर्थन करताना दिसतात.

कोसलापासूनच नेमाडेंनी खेडवळ प्रतिगामी संस्कृती बद्दलची अप्रामाणिक ओढ दाखवली होती. आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित नेहरूंबद्दल अनुचित उद्गार, त्यांची तुच्छतादर्शक थट्टा पुण्यामधील स्त्रिया वेश्या आहेत असे विधान कारण त्या आवरून संध्याकाळी घराबाहेर पडतात हे प्रसंग व विधाने त्याकाळी गांभीर्याने घेतले गेले नाहीत, त्यावेळी ते निष्पाप आचरट विनोद वाटले; परंतु, आता नेम ाडेंच्या कारकिर्दीचा पट पूर्ण झाल्यामुळे त्या प्रसंग व विधानांचा योग्य तो अर्थ लागतो. थट्टाखोरी हा नेमाडींच्या लिखाणाचा स्थायीभाव आहे मग ती कादंबरी असो अथवा समीक्षा! टिंगल-टवाळी शेरेबाजी किस्से सांगणे आणि भूतकाळातील गोष्टींचे अप्रामाणिक गौरवीकरण हा नेमाडेंच्या सर्व लिखाणाचे प्रमुख आशय व शैली आहेत. हिंदुत्ववादी संभाषित देखील याच वैशिष्ट्यांनी परिप्लुत आहे.

स्त्रियांच्या बाबतीत नेमाडे हिंदुत्ववादी लोकांप्रमाणे नेहमी स्वतःला उघडे पाडतात. त्यांना घरंदाज व्यथा सोसणाऱ्या स्त्रिया आदर्श वाटतात. स्त्रियांना मातृरुपात ते बघतात. त्यांच्या कादंबऱ्यांमधील सर्वात आधुनिक स्त्री झूल कादंबरीमधील आहे. ही एथ्नीक गोष्टींचा आंतरराष्ट्रीय बाजार करणारी आहे. नेमाडेंचीच जणू काही ती स्त्री आवृत्ती आहे. ते इतके प्रतिगामी आहेत की गेलेल्या लहान बहिणीच्या कोवळ्या गर्भाशयाचा त्यांना उल्लेख करावासा वाटतो. जेव्हा निदान लहान मुलामुलींच्या बाबतीत तरी गर्भाशय आणि इतर लैंगिक भेदाभेदाच्या गोष्टी गैरलागू असाव्यात. याबाबतीत त्यांचे चिं. त्र्यं. खानोलकरांबद्दलचे मत लक्षात घेण्याजोगे आहे. ते खानोलकरांना विकृत समजतात. एका मागासलेल्या मनोवृत्तीच्या माणसाची एका अत्यंत प्रगत आधुनिक लेखकाबद्दलची ही प्रतिक्रिया आहे. खानोलकरांनी न कचरता बेधडकपणे मानवी लैंगिकतेच्या बिभत्स, पाशवी, अमानुष वास्तवाचा पट अथकपणे मांडला. लैंगिकतेचे खरे डीमि स्टिफिकेशन खानोलकरांनी केले. र. धों. कर्वेपेक्षा हे अधिक क्रांतिकारक होते. कारण कर्वेंनी लैंगिकतेचे शरीरशास्त्रीय विवेचन करून ती सरल सुबोध व सामान्य बनवली. हे देखील माणसाच्या अहमला सुखावणारेच होते. परंतु खानोलकरांनी लैंगिकता या सुप्त क्षेत्रात माणुसकी कशी अस्थिर व निराधार होते याचे दर्शन घडवले. म्हणून नेमाडेंना खुद्द खानोलकर विकृत वाटले!

कादंबरी लेखक म्हणून सुद्धा नेमाडे मुळीच आधुनिक नाहीत. त्यांचे कादंबरीचे बांधणी तंत्र हे किस्सेवजा निवेदनाचे आहे जे कथन तंत्र अगदी सुरुवातीच्या कादंबऱ्यांमध्ये म्हणजे पिकारेस्क कादंबऱ्यांमध्ये वापरले गेले. इंग्रजी साहित्याला नेमाडे नेहमी कमी लेखतात या इंग्रजी साहित्यातील प्रथम कादंबरीकारांनी हे घटनांच्या सैल साखळीचे तंत्र वापरले होते. सेरवांतीसने त्याच्या डॉन क्विक्झॉटमध्ये सुद्धा हेच तंत्र होते; परंतु, सेरवांतीसने कथांमुळे होणारी नायकाची फसगत हाच विषय कादंबरीसाठी निवडला होता. या आत्मपरीक्षणाच्या सुरामुळे त्या कादंबरीला एक तात्विक खोली प्राप्त झाली. त्यामुळे ती कादंबरी अतिशय उच्च दर्जाची झाली परंतु त्यानंतर शंभर वर्षांनी आलेल्या इंग्रजी कादंबरीकर जसे की डेफो, रिचर्डसन, फिल्डिंग यांनी भटकणाऱ्या नायकाच्या मजेदार अनुभवांचे किस्से सांगण्यात धन्यता मानली. या किस्सेबाजीतून काही प्रमाणात प्रतिष्ठित समाजावर टीकाही झाली...पृष्ठ क्र. १५ वर

नेमाडेंच्या विधानामागे सत्ताधाऱ्यांना खूश करण्याचा हेतू तर नव्हे?

प्राचीन ग्रंथांत जे आहे त्याचे ऐतिहासिक विश्लेषण करण्याऐवजी त्यात आधुनिक विज्ञानातील प्रत्येक शोध शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे इतिहासापेक्षा वृथा अभिमानाला प्राधान्य देणे होय...

'पूर्वी खेड्यातील नाभिकही प्लास्टिक सर्जरी करायचे,' ही भालचंद्र नेमाडे यांच्या वक्तव्याची बातमी वाचली. प्राचीन भारतात प्लास्टिक सर्जरीचे तंत्रज्ञान होते, याचा पुरावा म्हणून गणपतीला हत्तीचे मस्तक जोडल्याची पौराणिक कथा सांगणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विधानाचे आश्चर्य वाटले नव्हते. कारण इतिहासाच्या चिकित्सेपेक्षा प्राचीन भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा प्रचार हे त्यांच्या हिंदुत्ववादी राजकारणाचे एक साधन आहे. पण स्वतःला पुरोगामी म्हणवणारे आणि ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित झालेले साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनीही पूर्वी खेड्यातील नाभिक प्लास्टिक सर्जरी करायचे, असे विधान केल्यामुळे त्याची चिकित्सा करणे आवश्यक ठरते. राजकारण्यांकडून पुराव्याविना केलेल्या दाव्यांकडे दुर्लक्ष केले, तरी साहित्यिक आणि विचारवंतांनी तरी पुराव्यांचा आग्रह धरावा, ही अपेक्षा चुकीची आहे काय? हा त्यांच्या प्रतिष्ठेवर केलेला हल्ला नसून त्यांच्या बौद्धिक प्रामाणिकतेला विचारलेला प्रश्न आहे.

सुश्रुतसंहितेत नाकाच्या पुनर्रचनेसह ...पृष्ठ क्र. १३ वर

जंगल उजाड करून पर्यावरणपूरक विकास?

...पृष्ठ क्र. ४ वरुन

चक्राचा, जैवविविधतेचा आणि स्थानिक पर्यावरणाचा अविभाज्य भाग असते. झाडे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत करतात, मातीची धूप कमी करतात, कार्बन साठवतात आणि असंख्य सजीवांना अधिवास पुरवतात. जंगल नष्ट झाल्यावर त्याचे परिणाम आसपासच्या परिसरापुरते मर्यादित रहातातच असे नाही. पाण्याची उपलब्धता, मातीची सुपीकता आणि स्थानिक हवामान यावरही त्याचे परिणाम होऊ शकतात. म्हणून जंगलांचा ऱ्हास आणि जलसुरक्षा यांचा संबंध दुर्लक्षित केला तर परिसरातील सजीव सृष्टीच धोक्यात येते. आज जगभर हवामानबदलाचे परिणाम अधिकाधिक तीव्रतेने जाणवत आहेत. हरितगृह वायूंचे उत्सर्जन, जीवाश्म इंधनांचा वापर, जंगलतोड आणि अनियंत्रित उपभोग यांमुळे पर्यावरणावरील दबाव वाढत आहे. या संकटावर मात करण्यासाठी एका बाजूला स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे आवश्यक आहे, तर दुसऱ्या बाजूला जंगलांचे संरक्षण करणेही तितकेच आवश्यक आहे. स्वच्छ ऊर्जेकडे वाटचाल करताना निसर्गाचा अनावश्यक विनाश केला, तर एका पर्यावरणीय समस्येवर उपाय शोधताना दुसरी समस्या निर्माण होऊ शकते. म्हणूनच ऊर्जा संक्रमणाच्या नावाखाली होणाऱ्या प्रकल्पांचेही काटेकोर पर्यावरणीय परीक्षण झाले पाहिजे. **महाराष्ट्र सरकार विकास म्हणजे मोठे उद्योग, मोठे प्रकल्प आणि मोठ्या गुंतवणुकीच्या घोषणा एवढेच मानत असेल, तर पर्यावरणाचे नुकसान करून मिळवलेला आर्थिक फायदा आणि त्यातून समाजाला भविष्यात भोगावी लागणारी किंमत, याची तुलना कशी करता येईल? एखाद्या उद्योगाला तातडीने जमीन उपलब्ध करून देणे सरकारला शक्य असते; पण त्या जमिनीवरील जंगल नष्ट झाल्यानंतर पर्यावरणीय हानी पूर्ववत करणे सरकारच्या आदेशाने शक्य आहे काय? निसर्ग सरकारच्या आदेशानुसार चालतो काय? म्हणूनच जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या भीमाशंकर परिसरात कोणताही मोठा प्रकल्प राबवताना अधिक खबरदारी घेणे आवश्यक आहे.**

आणखी एक वेगळाच मुद्दा असा की, भीमाशंकर हे शिवभक्तांचे श्रद्धास्थान आहे. महादेवाच्या तिसऱ्या डोळ्याच्या कथेत अन्यायाचा विनाश करणाऱ्या दैवी शक्तीची कल्पना आहे. पण प्रत्यक्ष जगात जंगलतोड थांबवण्यासाठी दैवी हस्तक्षेप कधीही झालेला दिसत नाही. कारण देव काल्पनिक आहे. म्हणून तो कधीही अन्यायाचा विरोध करण्यासाठी पिडीतांच्या बाजूने उभा रहात नाही. म्हणून झाडे तोडली जात असताना महादेवाचा तिसरा डोळा उघडेल आणि विनाश करणाऱ्यांना शिक्षा करेल, अशी अपेक्षा ठेवून उपयोग नाही. कारण धार्मिक कथांमधील दैवी शक्ती आणि प्रत्यक्ष पर्यावरणाचे रक्षण करणारी मानवी कृती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. महादेव खरोखरच सर्वशक्तिमान आणि अन्यायाचा विनाश करणारा असेल, तर त्याच्या निवासस्थानाच्या परिसरात जंगलतोड होताना आणि त्याचे घर उजाडताना पाहू तरी कसे शकतो? **तेव्हा जंगल वाचवण्यासाठी महादेवाच्या तिसऱ्या डोळा उघडण्यातच्या अपेक्षेपेक्षा माणसाच्या डोक्यातील विवेक जागा होणे अधिक महत्त्वाचे आहे. जंगल तोडले जात असताना भक्तांनी शांत बसावे आणि देवानेच काहीतरी करावे, ही भूमिका पर्यावरणाच्या दृष्टीने घातक आहे. देवावर श्रद्धा ठेवण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे; पण श्रद्धेच्या नावाखाली मानवी जबाबदारी झटकण्याचा अधिकार कोणालाही नाही. मंदिरात जाऊन अभिषेक आणि पूजा केल्याने जंगल वाचते, पाण्याचे स्रोत सुरक्षित राहतात किंवा वृक्षतोड थांबते, असे मानण्यास कोणताही ठोस वैज्ञानिक आधार नाही. त्यासाठी कायदे, लोकशाहीतील सहभाग, सार्वजनिक दबाव आणि प्रत्यक्ष पर्यावरणीय उपाय आवश्यक आहेत.** म्हणूनच देवाधर्माच्या नावाने राज्य करणाऱ्या सरकारने स्वतः ला काही थेट प्रश्न विचारले पाहिजेत. ज्या महादेवाला आपण निसर्गाशी जोडतो, त्याच्या परिसरातील जंगल तोडून आपण देवाचा अपमान तर करत नाही ना? पर्यावरणाचा विनाश करून आपण आपल्या देवाला बेघर करत नाही ना? सरकार जर मतलबी राजकारणासाठी पर्यावरणाचा ऱ्हास करत असेल तर जनतेने आता या जंगलतोडीविरोधात कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने आवाज उठवण्यासाठी रस्त्यावर उतरायला हवे. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सुद्धा जनतेला साथ द्यायला हवी.

काही विशिष्ट गुजराती उद्योगपती सरकारच्या इलेक्टोरल बॉण्डमध्ये करोडो रुपये गुंतवून पक्षाला प्रचंड देणगी देतात म्हणून त्यांना विशेष सवलती देऊन पर्यावरणाचा ऱ्हास करण्याचा परवाना दिला जातो काय? सरकारने मात्र उद्योगांच्या हिताला प्राधान्य देताना नागरिकांच्या दीर्घकालीन हिताकडे दुर्लक्ष करता कामा नये. प्रकल्पाला परवानगी देण्यापूर्वी पर्यावरणीय परिणामांचे स्वतंत्र मूल्यमापन, पर्यायी जागांचा विचार, स्थानिक नागरिकांचे म्हणणे आणि सार्वजनिक सुनावणीती ल आक्षेप यांना महत्त्व दिले पाहिजे. प्रकल्प पर्यावरणपूरक असल्याचा दावा करणाऱ्यांनी त्याला आधार देणारी माहितीही सार्वजनिक केली पाहिजे. प्रकल्पासाठी मंजूर झालेले वनक्षेत्र, पर्यावरणीय परवानग्या, वृक्षतोडीची व्याप्ती, वन्यजीवांवरील संभाव्य परिणाम आणि पर्यायी उपाय, माहितीच्या अधिकाराचा वापर करणे, पर्यावरणतज्ज्ञांची मदत घेणे, लोकप्रतिनिधींना जाब विचारणे आणि आवश्यक असल्यास न्यायालयीन मार्ग स्वीकारणे हे जंगलसंरक्षणाचे प्रभावी मार्ग ठरू शकतात. आज खरी गरज आहे ती विकासाच्या नावाखाली निसर्गाचा विनाश करण्यास विरोध करण्याची आहे. पर्यावरणाची हानी करून केलेली प्रगती भविष्यातील पिढ्यांवर संकट लादत असेल, तर तिचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक आहे. कारण निसर्गाचे रक्षण करण्याची शक्ती आपल्या विवेकात, विज्ञानात, कायद्यात आणि सामूहिक कृतीत आहे. ती शक्ती वापरण्याची वेळ आता आली आहे.

-जगदीश काबरे

'लेखकराव' ते 'राजलेखक': भालचंद्र नेमाडे यांची वैचारिक घुसमट!

...पृष्ठ क्र. ८ वरुन

त्यामुळेच नेमाडे हे हिंदुत्ववादी राजकारणाला पाठबळ पुरवत आहेत, असा ग्रह आपोआपच तयार होतो.

''हिंदुत्व म्हटले की गोधराची आठवण होते; मात्र हिंदुत्वाचा अर्थ केवळ एवढाच नाही. सर्वांना जवळ घेणारे आणि दूरच्या देशांनाही जोडणारे हिंदुत्व आहे. पुढील पिढीला हिंदुत्वाचा खरा अर्थ समजावून सांगण्याची गरज आहे. साहित्याच्या माध्यमातून हा व्यापक विचार रुजवला पाहिजे.''

आता या प्रत्येक वाक्यात 'बाधक' असे काहीतरी आहेच. हिंदुत्व म्हटले की गोधराची आठवण होते – याचा अर्थ यामध्ये जे घडले ते गैर होते, असा अर्थ ध्वनित होतो.

'मात्र हिंदुत्वाचा अर्थ केवळ एवढाच नाही' – या पुढच्या वाक्यात तर गोध्रा घटनेविषयीची नापसंती दर्शवली आहे.

'सर्वांना जवळ घेणारे आणि दूरच्या देशांनाही जोडणारे हिंदुत्व आहे' – यामध्ये सध्याच्या हिंदुत्वात चाललेल्या संकुचितपणावर रोख ठेवून व्यापक सर्वसमावेशकता हवी, हे सूचित केले आहे. दूरचे देश म्हणजे पाकिस्तान वगैरे मुस्लिम देशही आले.

'पुढील पिढीला हिंदुत्वाचा खरा अर्थ समजावून सांगण्याची गरज आहे' – यामध्ये सध्या हिंदुत्वाचा जो विचार रुजवला जात आहे, तो खरा अर्थ नव्हे, हे देखील ध्वनित केले आहे.

'साहित्याच्या माध्यमातून हा व्यापक विचार रुजवला पाहिजे' – ही साहित्यिकांना सध्या जे सुरू आहे, त्याच्या विरोधात लिहिण्यासाठी दिलेली समज आहे.

त्यांच्या भाषणात त्यापुढे ते 'वर्तमानकाळ हा अस्तित्वात नसतोच' असे म्हणतात, तेव्हा समकालीन राजकारणाकडे दुर्लक्ष करा, असा सूर आहे.

पण नेमाडे यांची गडबड अशी आहे की, ते ज्या संस्थेच्या प्लॅटफॉर्मवर पुरस्कार स्वीकारण्यासाठी गेले आहेत, त्यांना थेट सुनावणारी मांडणी करणे त्यांना गैरसोयीचे वाटत असावे. 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' वगैरे आहेच. या मखलाशीने ते मोघमात बोलतात, जे त्यांच्या अंगलटी येतं!

मग 'आपल्याकडे अमुक होतं आणि तमुक होतं' अशा खऱ्याखोट्या बढाया मारत, असं 'प्लास्टिक सर्जरी' वगैरे उठवळ बडबडण्याची त्यांची पूर्वापार शैली आहेच. ती इथे त्यांना भोवताना दिसते आहे.

यावरून एक गोष्ट आठवली ...

कुमार केतकरांना एकदा त्यांच्या जातीच्या म्हणजे चित्पावन ब्राह्मणांच्या संमेलनात भाषणासाठी बोलावले होते, तर तिकडे जाऊन त्यांनी असे खडे बोल सुनावले की, काही श्रोते त्यांच्या अंगावर धावून आल्यामुळे आयोजकांना त्यांचे भाषण थांबवून त्यांना संरक्षणात बाहेर न्यावे लागले...

पण नेमाडे यांनी 'समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना लिहिते करण्याच्या' आंतरिक प्रेरणेमुळे अगदी सुरुवातीपासूनच संस्कृती/परंपरेतील आपल्या मांडणीला सोयीचे ठरणारे गोडवे/थोरवी गायली आहे. ती आता हिंदुत्ववादी राजकारणाला ऊत आलेल्या काळात त्यांना भोवते आहे.

नेमाडे यांच्या देशीवाद/वास्तववादाला मी कायमच विरोध केला असूनही, मला त्यांची ही एकप्रकारे 'शेम्बडात अडकलेल्या माशीसारखी' दुरवस्था झाली आहे, ती समजून घ्यावीशी वाटते, ज्यासाठी टीकेचा भडीमार अर्थातच होऊ शकतो!


...सतीश तांबे

कुठल्याही कोर्टात फेरी मारा.
नव्वद टक्के केसेस कौटुंबिक मालमत्तेच्या वादाच्या असतात !
सख्खे भाऊ, बहीण,
चुलत भाऊ, बहिणी,
आत्ये, मामे, मावस भावंडं,
आजोबा, काका, मामा, मावश्या,
सगळे कोर्टाच्या कुरुक्षेत्रावर महाभारताचे युद्ध लढत असतात.
प्रत्येकाला आपला हक्क हवा असतो.
आपली बाजू मांडताना प्रत्येक जण दुसऱ्याला हिरीरीने सांगतो : माझ्या बापाची प्रॉपर्टी मी सोडणार नाय.
आपले ग्रंथ रामायण आणि महाभारत
त्यात सुद्धा प्रॉपर्टीचाच वाद !
महाराजा दशरथाचं राज्य आपल्या मुलाला भरताला मिळावं
अशी राणी कैकयीची ईच्छा !
त्यापायी श्रीरामांना वनवास भोगावा लागला.
आणि त्यातून रामायण घडलं.

महाभारतात कौरवांना पांडवांचा हक्क द्यायचा नव्हता.
पांडवांनी श्रीकृष्णा मार्फत फक्त पाच गावं मागितली.
नकार मिळाल्यावर महाभारताचे युद्ध पेटले.
तेव्हाचे कौरव असोत
की आताचे कदम कांबळे !!
तेव्हाचे पांडव असोत
की आताचे पाटील पाटोळे !!
कोणी स्वतःचा हक्क सोडत नाहीत.
वडिलोपार्जित इस्टेट प्राणपणाने जपतात.
इस्टेटीसाठी कोर्टकचेरी होते.
हाणामाऱ्या होतात.
डोकी फुटतात.
खून पडतात.

आता नीट लक्षात घ्या.
हा खंडप्राय देश
आपल्या बापाजाद्यांनी आपल्यासाठी ठेवला.
बापजादे म्हणजे
आपले तत्कालीन नेते !
ज्यांनी आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिलं.
त्यासाठी तुरुंगवास भोगला.
हालअपेष्टा सहन केल्या.
आपण आपल्या इस्टेटी साठी जागरूक राहिलो नाही.
आपली इस्टेट भुरट्यांनी बळकावली.
ज्यांचे बापजादे कुठेच नव्हते,
त्यांनी आपल्याला गंडवून देशरुपी इस्टेट ताब्यात घेतली.
तळटीप :
आपल्या बापाची प्रॉपर्टी समजून हा देश सांभाळा.
सखोल तळटीप :
गांधी, आंबेडकर, नेहरू
हे सगळे स्वातंत्र्यसैनिक
आपले पूर्वज,
त्यांनी आपल्यासाठी ठेवलेली इस्टेट म्हणजे भारत देश आणि संविधान !!
सहज जाता जाता :
घरच्या इस्टेटीसाठी आपण जसे स्वार्थी होतो,
तसे स्वार्थी आपण आपल्या देशासाठी व्हायला हवं !!

ताजा कलम :
मंदिराची दान पेटी हडप करणाऱ्यांनी,
आधी हा देश हडप केला.
अंतिम सत्य :
या देशाकडे आपल्या बापाची प्रॉपर्टी समजून बघा.
तरच या देशावर प्रेम करता येईल !!



शाश्वत सत्य :
हडप करणाऱ्या चोरट्यांचं कधीच या देशावर प्रेम नव्हतं.
ते नेहमीच थापा मारून पोट भरणारे पोटार्थी भिक्षुक होते !!

...डी. उषा



आपला खासमखास इस्त्रायली दोस्त 'बिबी', निवडणुकीत मार खात असताना आणि विरोधकांवर निवडणुकीत पैसा-वाटपाचा आरोप करत असताना... आमचे दिल्लीश्वर 'विश्वगुरु' गालातल्या गालात छानसे मिस्कील हसले आणि दोस्ताला चार सांत्वनाचे शब्द फोनवर ऐकवताना म्हणाल्याचं समजतं,

'नेतान्याहू दोस्ता, तू अगदीच पोरकट निघालास रे...मी तुला कित्ती कित्ती हुश्शार समजत होतो आणि तू किती बावळट निघालास? अरे बघ, आम्ही भाजप-संघीय लोकं, एवढी 'स्मार्ट' की, आमच्याकडे आम्ही खुलेआम PMCare Fund, इलेक्टोरल-बॉण्ड्स, बोगदे-पूल व महामार्ग कंत्राटांतली भरभक्कम टक्केवारी व टोलवसूली आणि शिवाय, अंबानी-अदानीसारख्या लंगोटीयार दोस्तांकडून कित्येक टेंपो भरभरुन 'निवडणूक-चंदा' (जोडीला अयोध्येतल्या राममंदिरातली 'चंदाचोरी', तोंडी लावण्यापुरती असते) वगैरे गोळा करतो...तो पैसा राजरोस वाटतो आणि मतदारांची मतं बोली लावून सर्रास विकत घेतो...तुला असलं काही सुचलं नाही का, बिबी? हल्ली तर निवडणुका हमखास जिंकण्याची 'नवी आयडिया' म्हणून, आम्ही 'लाडक्या बहिणीं'ना महाराष्ट्रात 'दीड हजार' तर, बंगालमध्ये 'जनसुराज'च्या प्रशांत किशोरमुळे, थोडी हवा टाईट होती आमची म्हणून दहा हजार' वाटले; ते ही, पक्षाच्या भरगच्च 'काळ्या' खिशाला बिलकूल चाट न देता, सरकारी-तिजोरीतूनच परस्पर व्यवस्था लावतच... पुढल्या वर्षी तर बघ, आमच्या उ. प्रदेशच्या निवडणुकीत आम्ही लाडक्या बहिणींना 'पन्नास हजार' वाटले तरी, आश्चर्य वाटून घेऊ नकोस! एक गोष्ट मात्र माझ्या कानात सांग, तुझ्याकडूनच आम्ही उसनवार घेतलेल्या 'पेगॅसस' टाईपचीच छुपी सॉफ्टवेअर्स वापरुन, निवडणुकीतली 'EVM' आम्ही बिनधास्त 'मॅनेज' करत असताना; तू गलदटासारखा अजून जुन्यापुराण्या मतपत्रिकांमध्येच अडकून पडलायस? बरं, एवढीच व्यवस्था लावून थांबणारे, ते आम्ही नव्हेच; आमची 'नागपुरी-शिकवण'च 'लय भारी' बघ! आम्ही चक्क निवडणूक-आयोग, सरन्यायाधीशांसारख्या बड्या हस्तींना, काखेत मारुन 'SIR'सारख्या राज्यघटनेला धाब्यावर बसवणाऱ्या मतदान-प्रक्रिया, बुलडोझर फिरवल्यासारख्या देशभर सुरु केल्यात...नेहमीच काय आम्ही चोरीचपाटीचे धंदे तुझ्याकडून शिकायचे? कधितरी, तू सुद्धा आमच्याकडून काही शिक! तू काय आयुष्यभर त्या पॅलेस्टाईनी आणि लेबॅनॉनवाल्यांवरच तुझे ते 'मर्कावा' रणगाडे फिरवणार काय? कधि निवडणुकीत आपल्या नागरिकांवर पण फिरव, आमच्या 'SIR'सारखे! फोन ठेवताना, तुला एक विनंती करतो बाबा, ते तुझे निवडणुकीचे निकाल लवकर लाव की...दोनतीन दिवस उलटून गेले तरी, अजून निकाल पूर्ण झाले नाहीत म्हणजे रे काय? अरे इकडे आम्ही, सत्वर निकाल लागावेत म्हणून ती 'EVM'ची धोंड, समस्त भारतीयांच्या गळ्यात मारुन ठेवलीय...तू ही अशी निवडणुकीतली दप्परदिरंगाई शांतपणे खपवून घेण्याने, आमच्या इकडे लोकं 'मतपत्रिके'वर मतदानाची मागणी नाही का करणार? लक्षात ठेव, दोस्ताला मदत करावी; त्याला अडचणीत कधि आणू नये...त्यालाच 'दोस्ताना' म्हणतात, 'तोदा रबा' (**Toda Raba / הבר הדות**)!'

...राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

महात्मा फुलेंचे द्विजन्मशताब्दी वर्ष सुरू आहे.

युरोपियनांनी पादाक्रांत केलेले देश व त्यांना वसाहती बनविल्यानंतर भांडवली उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून त्या वसाहतींमध्ये असलेल्या ज्ञानाला मागास ठरविण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. भारतात मॅकॉलेने नवी शिक्षणव्यवस्था निर्माण केली ती यासाठीच. पण त्याचबरोबर फ्रेंच राज्यक्रांतीने जो आधुनिकतावाद जन्माला घातला, त्याने वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासही प्रोत्साहन दिले. १८, १९, २० वी शतके ही वैज्ञानिक प्रयोग, सिद्धांत, प्रमेय इत्यादींचा काळ होता. २१ व्या शतकात विशेषतः भारतात युरोपियनांनी दडपलेल्या ज्ञानाला पुनर्जीवित करण्याच्या नावाखाली खोटे विज्ञान, ज्याला इंग्रजीत स्यूडो सायन्स म्हणतात, त्याचे पेव फुटले आहे.

भारतात दीड–दोन शतकांत ब्राह्मणी थिसिसविरुद्ध अब्राह्मणी थिसिस उभी राहिली; पण जे सिंथेसिस व्हायला हवे होते ते सिंथेसिस होऊ शकले नाही. त्यामुळे प्रगतीशील विचार फक्त ब्लॅक अँड व्हाईटच पाहू शकला. त्यांनी ग्रे एरिया प्रतिगाम्यांना बहाल केले. त्याचाच फायदा घेऊन प्रतिगाम्यांनी अशिक्षित बहुजनांना पुन्हा मागे नेण्यासाठी सुरुवात केली आहे.

कालच आमचे कॉम्रेड अमर जोशी यांनी उल्हासनगरात शहीद हेमू कलानीचा पुतळा दाखवला आणि त्यांना १९ व्या वर्षी इंग्रजांनी फासावर चढवल्याचे सांगितले. चेंबूरमध्ये हेमू कलानी मार्ग आहे, हे नाव माझ्यासाठी काही नवीन नव्हते. पण मला वाटायचे ते कोणी तरी संघ–भाजपशी संबंधित असतील. सकाळी गुगल केले तर कळले, ते ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन या डाव्या विचारांच्या संघटनेशी संबंधित होते. पुढे वाचले की त्यांना फाशीची शिक्षा झाली तेव्हा ते आनंदित झाले होते व मरताना ते भगवद्गीता वाचत होते. तेव्हा मला जाणवले की शहीद भगतसिंग हे प्रत्यक्ष कम्युनिस्ट पक्षात नसतानाही ते कम्युनिस्टांचे आयकॉन बनतात; पण शहीद हेमू कलानी डाव्या विद्यार्थी संघटनेत असूनही त्यांना दुर्लक्षित केले जाते.

असो, खालची मूळ पोस्ट जरूर वाचा.

संघ–भाजप या देशातील समस्त कष्टकरी बहुजनांना पुन्हा अंधारयुगात ढकलण्याच्या तयारीत आहे. इथे मी अभिजन–बहुजन या संज्ञा केवळ जातीच्या अर्थाने वापरत नाही, तर शोषक–शासक नी शोषित–शासित जातीवर्ग या आधारे वापरत आहे. त्यांनी व या शोषणातून सर्वंकष मुक्तीचे स्वप्न पाहणाऱ्यांनी जरूर वाचावी.

@Pramod Munghate यांची पोस्ट इथून पुढे.


डार्विन, न्यूटन आणि गोडबोलेंचा 'बिग बँग' कसा झाला त्याची गोष्ट.

अच्युत गोडबोले यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेने जीवनगौरव पुरस्कार दिला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. 'किमयागार' पुस्तकाच्या प्रसारार्थ २००७ मध्ये एकदा त्यांचे नागपुरात भाषण झाले. त्या भाषणाची हकीकत मोठी गमतीशीर आहे. (ती पुढे सांगतोच...) तर त्या कार्यक्रमाला नागपुरातील तत्कालीन पोलीस आयुक्त डॉ. सत्यपाल सिंह हे होते. २०१४ मध्ये बीजेपीच्या लाटेत नोकरी सोडून खासदार झाले. पुढे ते देशाच्या केंद्रीय मंत्रिमंडळात मानव विकास खात्याचे मंत्रीही झाले. तेव्हापासून पाठ्यपुस्तकातून डार्विनला, नंतर न्यूटनला

विद्येविना मती गेली, मतिविना गती गेली,
गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले,
ऐसे अनर्थ एका अविद्येने केले.
हे फुलेंनी निक्षून सांगितले होते.

उडवून टाकायचे स्वप्न होते.

अलीकडेच एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमातून मुस्लिम इतिहासानंतर डार्विनला सोडचिठ्ठी दिली आहे. पुढचा नंबर अर्थातच न्यूटनचा आहे. कारण २०१८ मध्ये डॉ. सत्यपाल सिंह म्हणाले होते, आयझॅक न्यूटन यांच्यापूर्वी कितीतरी आधी वेदांमधील मंत्रांमध्ये गतीचे नियम सांगितले आहेत. त्यापूर्वी त्यांनी डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला आव्हान देत मानवाची उत्पत्ती ही माकडांपासून झाली नसल्याचा दावा करीत त्यासाठी वेदांचा संदर्भ दिला होता.



२०१८च्या जानेवारी महिन्यात सिंह यांनी चार्ल्स डार्विनचा उत्क्रांतीवादाचा सिद्धांत हा चुकीचा असून शाळा आणि महाविद्यालयांतील अभ्यासक्रमातून तो हटवण्यात यायला हवा, असे त्यांनी म्हटले होते. ते आता प्रत्यक्षात आणले आहे. पृथ्वीवर मानवाचा जन्म मानव म्हणूनच झाल्याचा दावा त्यांनी केला होता. यासाठी वेदांमध्ये मानव माकडांपासून तयार झाल्याचे म्हटलेले नाही, असा दाखला त्यांनी दिला होता.

तर त्या कार्यक्रमाची हकीकत अशी : त्या दिवशी नागपूरच्या लक्ष्मीनगरातील सायंटिफिक सभागृहातील एका व्याख्यानाच्या वेळी सत्यपाल सिंह यांची अशीच एक लीला दिसून आली. आयआयटीतून केमिकल इंजिनिअर होऊन आदिवासी चळवळीत काम करणाऱ्या अच्युत गोडबोलेंच्या भाषणाचा तो प्रसंग होता. राजहंस प्रकाशनाच्या मंथन व्यासपीठाने ते भाषण आयोजित केले होते. 'आर्यभट ते बिग बँग' असा विषय होता. सायंकाळी सहाचे भाषण. साडेसहापर्यंत हॉल रिकामाच होता. राजहंस प्रकाशनाचे आयोजक नरेश सब्जीवालेंना, काय झाले, विचारले. तर ते म्हणाले, आज अष्टमी आहे. येतील लोक. आणि थोड्याच वेळात हॉल भरला. अध्यक्षस्थानी नागपूरचे पोलीस आयुक्त सत्यपाल सिंग होते. हारतुरे झाले, परिचय झाला. 'किमयागार'सारखे राजहंसी पुस्तक लिहून मराठीत विज्ञानविषयाला अत्यंत रंजक करणाऱ्या अच्युत गोडबोलेंच्या शब्दगंगेची ती सफर फार सुखद होती.

गुबगुबित चेहरा आणि पांढऱ्या रंगाचा ब्रशचा फटकारा मारलेली अतिशय सुंदर दाढी. एखाद्या कॅफेमध्ये आपल्यासमोर बसून गोडबोले बोलत आहेत, इतका मनमोकळा आणि खाजगी आवाज. संगणकापासून मॅनेजमेंटपर्यंतच्या विविध हायटेक विषयांवर जगभर संचार असलेल्या गोडबोल्या अच्युतचे भाषण नुसते ऐकत राहावेसे वाटत होते. मराठीत विज्ञानविषयाला लोकप्रिय करणाऱ्या अच्युत गोडबोलेंच्या शब्दगंगेची ती सफर फार सुखद असते. ज्ञानाचा आनंद कसा असतो, याचा अनुभव देणारी.

पण हाय! त्यादिवशी तसे सुख नव्हते. गोडबोले भाषणात सांगत होते, चौदाशे कोटी वर्षांपूर्वी या जगाची निर्मिती झाली. माणूस एक लाख वर्षांपूर्वी सृष्टीत आला, असे विज्ञान सांगते. आर्यभट्ट हा भारतातील सर्वात मोठा गणितज्ज्ञ होता. त्याने अनेक अत्यंत उपयुक्त सिद्धांत मांडले. त्यांनी न्यूटन–कोपर्निकसपासून मॅक्सवेलपर्यंतच्या वैज्ञानिक शोधांची व विश्वाच्या निर्मितीचा वेध घेणाऱ्या सिद्धांतांची माहिती अनेक किस्स्यांसह रंजकपणे सांगितली. गोडबोलेंच्या मते, विज्ञानात, गणितात खूपच मोठे विचारवंत होऊन गेले, यात शंकाच नाही. अनंत या संकल्पनेचा संदर्भ पहिल्यांदा सांगणाऱ्या बाराव्या शतकातील भास्कराचार्यानंतर ही प्रगती का खुंटली, असा प्रश्न निर्माण होतो. आपण अल्पसंतुष्ट झालो का? वाईट भाग हा की ही अधोगती आजपर्यंत चालू राहिली. अगदी बोटावर मोजण्याइतके सोडले तर आपल्याकडे नोबेल पारितोषिक विजेतेही झाले नाहीत. कदाचित या न्यूनगंडामुळेच की काय, पण पुष्पक विमान, क्षेपणास्त्र आणि सापेक्षतावाद, क्वांटम मेकॅनिक्स यांच्यासारखं विज्ञान आपल्या पूर्वजांना माहीतच होतं किंवा आपल्या धर्मग्रंथात ते सांगितलंच आहे, अशा तऱ्हेची फुशारकी आपण मारत बसलो.

हे सांगत असताना पुराणातील वैज्ञानिक प्रगतीचे दाखले कसे चुकीचे आहेत आणि 'रामायण' आणि 'महाभारत' ही महाकाव्ये आहेत, हे सांगण्याचे पाप गोडबोलेंनी केले. इथेच त्यांच्या व्याख्यानाचे मुसळ केरात गेले. अध्यक्ष डॉ. सत्यपालसिंग अस्वस्थ झाले. त्यांच्या सूचनेनुसार आयोजक सब्जीवालेंनी अखेर गोडबोल्यांना आता आवरा, अशी चिठ्ठी धाडली. गोडबोलेंनी आपले भाषण आवरले. अध्यक्षांचे भाषण सुरू झाले.

त्यांनी प्रथमच सांगून टाकले की त्यांना **'रामायण' आणि 'महाभारत' कल्पित असल्याचे गोडबोल्यांचे म्हणणे खटकले. विश्वाची निर्मिती चौदाशे कोटी वर्षांपूर्वी झाली. माणूस एक लाख वर्षांपूर्वी सृष्टीत आला, या मताशी मी सहमत नसल्याचे त्यांनी ठासून सांगितले. त्यांच्या मते विश्वाचे सर्व रहस्य आपल्या ऋषीमुनींच्या प्राचीन ग्रंथातच मांडले आहे. त्यांनी श्रोत्यांना विचारले की, ''आजचे लोक अधिक खरे बोलतात की प्राचीन लोक अधिक खरे बोलतात?'' एखाद्या महाविद्यालयीन वादविवादपटूचा तो आविर्भाव होता. अर्थातच श्रोते म्हणाले, ''प्राचीन लोक खरे बोलत.'' (म्हणजे आज आपण** ...पृष्ठ क्र. १४ वर

नेमाडेंच्या विधानामागे सत्ताधाऱ्यांना खूश करण्याचा हेतू तर नव्हे?

...पृष्ठ क्र. १० वरून

विविध शस्त्रक्रियांचे वर्णन आढळते. मात्र, या पुराव्यांवरून आधुनिक अर्थाने प्लास्टिक सर्जरीचे सर्व तंत्रज्ञान प्राचीन भारतात विकसित झाले होते किंवा खेड्यातील नाभिकही अशा शस्त्रक्रिया करत होते, असा निष्कर्ष काढता येत नाही. नाकाच्या पुनर्रचनेची एखादी विशिष्ट पद्धत अस्तित्वात असणे आणि आधुनिक प्लास्टिक सर्जरीचे व्यापक ज्ञान असणे, यांत फरक आहे. म्हणून नेमाडे यांना काही सरळ प्रश्न विचारले पाहिजेत. कोणत्या काळातील आणि कोणत्या प्रदेशातील नाभिक प्लास्टिक सर्जरी करायचे? या दाव्याला पुष्टी देणारे वैद्यकीय ग्रंथ, ऐतिहासिक दस्तऐवज किंवा समकालीन नोंदी कोणत्या? हे संदर्भ त्यांनी दिले, तर भारतीय वैद्यकीय इतिहासाच्या अभ्यासात मोलाची भर पडेल. पण पुराव्यांविना केलेले विधान केवळ वक्त्याच्या प्रतिष्ठेमुळे सत्य ठरत नाही. **भारताने गणिताच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले, शून्याच्या संकल्पनेच्या विकासात मोलाची भूमिका बजावली आणि वैद्यकशास्त्रातही लक्षणीय प्रगती केली, याचे पुरावे आहेत. याचा अभिमान बाळगण्यासाठी काल्पनिक दाव्यांची भर घालण्याची गरज नाही. उलट, पुराव्यांवर आधारित इतिहासच त्या उपलब्धींचे खरे महत्त्व स्पष्ट करतो.**

त्यांनी आत्म्याच्या ज्ञानाविषयी केलेल्या विधानालाही हाच निकष लावला पाहिजे. भारतीय तत्त्वज्ञानात आत्मा, पुनर्जन्म आणि मृत्यूनंतरच्या अस्तित्वाविषयी विस्तृत चर्चा झालेली आहे. परंतु एखाद्या संकल्पनेवर हजारो वर्षे चिंतन झाले, म्हणजे तिचे अस्तित्व वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले, असे होत नाही. आत्मा ही शरीरापासून स्वतंत्र अस्तित्वात असणारी सत्ता असल्याचा निर्णायक, पुनरावृत्तीने पडताळता येणारा वैज्ञानिक पुरावा आजपर्यंत उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे आत्म्याविषयी प्राचीन काळापासून तात्त्विक चर्चा होत असल्याचे मान्य करणे आणि आत्म्याचे वैज्ञानिक ज्ञान प्राचीन भारतीयांना होते, असे म्हणणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. प्रश्न प्राचीन भारतीय संस्कृतीचा अवमान करण्याचा नाही; तर तिच्या नावावर कितीही मोठा दावा केला, तरी त्याला पुरावा मागण्याचा आहे. प्राचीन भारतीयांनी काही क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली, तर काही बाबतींत त्यांच्या कल्पना आजच्या वैज्ञानिक कसोटीवर टिकत नाहीत. हा फरक मान्य करण्यात कमीपणा नाही. उलट, प्राचीन ग्रंथांत जे आहे त्याचे ऐतिहासिक विश्लेषण करण्याऐवजी त्यात आधुनिक विज्ञानातील प्रत्येक शोध शोधण्याचा प्रयत्न करणे म्हणजे इतिहासापेक्षा वृथा अभिमानाला प्राधान्य देणे होय.

सत्ताधाऱ्यांची तळी उचलणाऱ्या विचारवंतांची या काळात चलती आहे; म्हणून नेमाडे यांच्या विधानामागे सत्ताधाऱ्यांना खूश करण्याचा किंवा पद्मभूषणसारखा पुरस्कार मिळवण्याचा हेतू आहे काय, अशी शंका येते. ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यामुळे एखादी व्यक्ती इतिहास, विज्ञान आणि तत्त्वज्ञान या सर्व विषयांतील अंतिम प्राधिकारी ठरत नाही. साहित्यिक प्रतिभेचा आदर राखूनही तिच्या विधानांची कठोर चिकित्सा करता येते. उलट, प्रतिष्ठित व्यक्तीने केलेले विधान म्हणून त्याला पुराव्यांविना स्वीकारले, तर विवेकवादाचा आग्रहच निरर्थक ठरेल. नेमाडे यांनी आपल्या विधानांच्या समर्थनार्थ कोणते पुरावे वापरले, कोणत्या ग्रंथांचा आधार घेतला आणि 'प्लास्टिक सर्जरी' हा शब्द नेमक्या कोणत्या अर्थाने वापरला, हे स्पष्ट करावे. त्यांचे दावे पुराव्यांवर टिकले, तर ते स्वीकारण्यास हरकत नाही; अन्यथा त्यांनी ते दुरुस्त करावेत, ही अपेक्षा.

प्राचीन भारताचा गौरव करण्यासाठी त्याच्या नावावर आधुनिक विज्ञानातील शोध खपवण्याची गरज नाही. पुराव्यांनी सिद्ध होणाऱ्या उपलब्धींचा अभिमान बाळगणे आणि सिद्ध न झालेल्या दाव्यांना नाकारणे, हाच खऱ्या विवेकवादाचा निकष आहे. पंतप्रधान असोत किंवा ज्ञानपीठ पुरस्कारविजेते साहित्यिक, पुराव्यांची कसोटी सर्वांना समान असली पाहिजे.

...जगदीश काबरे

महात्मा फुलेंचे द्विजन्मशताब्दी वर्ष सुरू आहे

...पृष्ठ क्र. १३ वरून

सगळे बहुतांशी खोटे बोलतो!) मग डॉ. सिंग यांनी पौराणिक दाखले देत ऋषींचे महत्त्व पटवून दिले. ज्ञानी ब्राह्मण मात्र पूजा करताना 'संकल्प मंत्र' म्हणतो. त्याद्वारे काळाचे खरे वर्णन केले जाते. युगाची रचना, मन्वंतर खरा काळ सांगतो. विश्व ४ अब्ज ३२ कोटी वर्षे जुने असल्याचे पौराणिक ग्रंथ सांगतात. त्याची रचना करणारे ऋषी कधी खोटे बोलूच शकत नाहीत. आजचे लोक खोटे बोलतात. कारण त्यांच्यावर लॉर्ड मॅकॉलेने दिलेल्या शिक्षणपद्धतीचा प्रभाव आहे. भारतीय संस्कृतीचा ऱ्हास करण्याचे षड्यंत्र इंग्रजांनी रचले. आता 'रामायण' आणि 'महाभारत' कल्पित असल्याचे सांगणारे लोक लॉर्ड मॅकॉलेचे षड्यंत्र तडीस नेत आहेत. त्यामुळेच आपल्या महान प्राचीन पण अत्यंत प्रगत असलेल्या संस्कृतीचा अपमान करण्याची हिंमत हे करीत आहेत.

सत्यपाल सिंग यांच्या मते, न्यूटनने गुरुत्वाकर्षणाची संकल्पना मांडली, त्यापूर्वी कितीतरी आधीच ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातच गुरुत्वाकर्षणाबद्दल माहिती आली आहे. विश्वात नऊ नव्हे तर दहा ग्रह आहेत, हे श्रीमद्भागवत सांगते. ग्रहांतील अंतर मोजण्याचा फॉर्म्युला याच ग्रंथात नमूद आहे. पृथ्वी शेषनागावर आहे, असे पौराणिक ग्रंथांतील वर्णन खरे आहे. आपल्या आकाशगंगेचे बारकाईने निरीक्षण केल्यास ती शेषनागाच्या आकाराची असल्याचे दिसून येते. रावणाच्या काळात चंद्रशक्तीचा वापर करून पाणी मिळिवले जात होते.

सिंग यांच्या वादाचा विषय येथे गंभीरपणे घेण्याचे कारण म्हणजे तो प्रातिनिधिक आहे. त्यांच्यासारख्या संस्कृतीरक्षकांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे डॉ. जयंत नारळीकरांनी अत्यंत नम्रपणे केव्हाच देऊन टाकली आहेत. पण बाहेरून अत्यंत उच्चभ्रू, उच्चशिक्षित वाटणाऱ्या उच्चपदस्थांना आजही आतून न्यूटन–आइन्स्टाइन यांच्या विज्ञानाचे महत्त्व अजिबात वाटत नाही. म्हणूनच देशातील सर्वोच्च तांत्रिक संस्थेत शिकलेले व शिकविणारे उच्चभ्रू आजही गणपतीच्या मूर्तीला दूध पाजत असतात, हीच चिंतेची बाब आहे. रामायणाच्या बालकांडात वाल्मिकीने म्हटले आहे, ''जोवर भूतलावर पर्वत आणि नद्या राहतील, तोवर रामायणाची कथा सर्व लोकांत राहील.'' ते खरेही ठरले आहे. ती समाजमनात इतकी रुजली आहे की, ''रामायणाची कथा'' कथा नसून तो इतिहासच आहे, असे लोकांना वाटत असले, तर त्यात गैर काहीच नाही. पण लोकांच्या या श्रद्धेचा फायदा घेऊन कुणी राजकारण करीत असेल, तर ते गैर आहे. त्यांच्या धार्मिक अस्मितेला वारंवार आवाहन करणे हे मूलतत्त्ववादाचेच एक रूप आहे. अलीकडे त्याचा अनुभव अधिक येत आहे.

अशा लोकांबद्दल नारळीकर म्हणतात की, एकीकडे हे लोक पौराणिक ग्रंथांकडे इतिहास म्हणून पाहावे, ते सामान्य माणसांसाठी लिहिलेले ग्रंथ आहेत, त्यांच्याकडून वैज्ञानिक माहितीची अपेक्षा करू नये, असेही म्हणतात. मात्र त्याच ग्रंथांच्या आधारे 'आपले पूर्वज विज्ञानात व तंत्रज्ञानात खूप प्रगत होते', असाही दावा करतात. वकिलाच्या कुशलतेने असा दावा मांडून जिंकणे आणि वैज्ञानिक पुराव्याने सिद्ध करणे यात फरक आहे. पुराणातील विमानाचे उल्लेख वाचून विमान कसे बनवता येईल, याचे आकलन होत नाही. रेडिओची जाहिरात वाचून रेडिओ संच बनविता येईल का? ब्रह्मदेवाच्या आख्यायिकेतून सापेक्षतावादाच्या सिद्धांतातील निरीक्षकांवर अवलंबून असलेली गती अपेक्षित आहे का? नाही. कारण त्या आख्यायिकेत गणिती तपशील नाही.

अल्विरूनी हा फारसी इतिहासकार म्हणतो, भारतीय गणित आणि खगोलशास्त्र म्हणजे मोत्याची शिंपले आणि आंबट खजूर यांचे मिश्रण वाटते, किंवा मोती आणि चिखल, बहुमोल खडे आणि दगड–धोंडे यांचे मिश्रण वाटते. त्यांचा उपयोग करणाऱ्यांमधला फरक कळत नाही. कारण ज्या वैज्ञानिक पातळीतून हे फरक समजतात ती पातळी यांनी गाठलेली दिसत नाही. त्यामुळेच आर्यभट आणि भास्कराचार्यांनी विकसित केलेले खगोलशास्त्र पुढे फलज्योतिषाच्या दिशेने वळले. विज्ञानाच्या बाबतीत असे म्हणता येईल की, अल्पसंतुष्ट वृत्तीमुळे स्वतःची परिस्थिती सुधारण्याकरता विज्ञानाचा विकास करण्याची इच्छाच भारतीयांना झाली नाही, असे नारळीकरांना वाटते.

आर्किमिडीस, युक्लीड, पायथॅगोरस यांचे संशोधन शाळेत शिकवतात ते पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करण्यासाठी नव्हे. ते वैज्ञानिक भाषेत मांडता येते, आकडेवारीसकट. असे वैज्ञानिक शिस्तीत मांडलेले पौर्वात्य संशोधन असल्यास ते अभिमानाने शाळेत शिकवू. भारतातील गणितात शून्याचा शोध लागला, दशांश पद्धती वापरली जात होती, हे सिद्ध झाले ते अशाच वैज्ञानिक माहितीवरून व त्याचा अभिमान आपण बाळगणे योग्यच आहे.

पुराणातील विज्ञानाच्या बाबतीत नीर–क्षीर–विवेक पाहिजे. संस्कृत भाषेच्या लवचिकपणामुळे संस्कृत ग्रंथातील पुरातन माहितीचा अर्थ लावताना घोळ होतो. शुक्रनीतीत आधुनिक व्यवस्थापनशास्त्रातील कामगारांच्या संबंधांबद्दल अद्ययावत माहिती कुणीतरी नारळीकरांना दाखविली. अधिक खोलात जाऊन तपासणी केली तेव्हा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचेच कामगारांसंबंधीचे नियम संस्कृतमध्ये श्लोकबद्ध करून अठराव्या शतकात शुक्रनीतीत घुसडल्याचे त्यांच्या लक्षात आले.

थोडक्यात, वैज्ञानिक माहिती व वैज्ञानिक जाणिवेचा प्रसार करण्याची महाराष्ट्राला अभिमानास्पद परंपरा आहे. पण त्याच परंपरेतील अच्युत गोडबोले यांच्या अतिशय सुंदर भाषणाचे असे 'रामनाम सत्य है!' झाले.

*...**प्रमोद मुनघाटे** यांची पोस्ट साभार.*

संघ दोन समांतर व्यवस्था राबवतो!

पहिली म्हणजे स्वतः संघाची एक व्यवस्था आहे जिचं कामकाज अगदी गुपित पद्धतीने चालत असतं, जे काठावरील संघवाल्यांना देखील कळू दिलं जात नाही. गांधी हत्येनंतर तर संघ लिखित कारभार कटाक्षाने टाळतो. संघटनेची आणि सदस्यांची नोंदणी नाही. त्यामुळे सोयीचं वाटतं तेव्हा तो आमचाच आणि अंगलट आलं तेव्हा आमचा काही संबंध नाही, असा खेळ खेळता येतो. संघाची लिखित घटना अथवा अधिकृत जाहीरनामा सापडत नाही. मनुस्मृतीसारखी विषमतावादी व्यवस्था शेकडो वर्षांपासून भारतीय समाजाच्या अगदी मज्जातंतूत शिरलेली असताना नव्याने घटना लिहायची गरज काय? दुसरी व्यवस्था म्हणजे संघाने लोकशाहीचा खेळ खेळण्यासाठी आणि निवडणूक जिंकण्यासाठी तयार केलेली यंत्रणा, ज्याचा प्रत्यय सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या क्लिपमध्ये येतो. जगजाहीर आहे की संघाला लोकशाही आणि स्वातंत्र्य, समता, बंधुभाव सारख्या मूल्यांवर आधारित संविधानाचा तिरस्कार आहे आणि तो वेळोवेळी व्यक्तदेखील केला आहे! हे सुद्धा जगजाहीर आहे की संघाला तिरंगा ध्वजदेखील अमान्य आहे! त्यामुळे अनेक दशकं त्यांनी तिरंगा फडकवला नाही. आता नाईलाजाने नाटक करावं लागतं. लोकशाहीचा खेळ तर खेळावा लागेल.

निर्णायक सत्ता हातात राखून कसा खेळ खेळायचा, हे संघाला ठाऊक आहे. संघाचं राजकारण कधीही प्रस्थापित विरुद्ध विस्थापित असं चालत नसून प्रस्थापित नंबर एक विरुद्ध प्रस्थापित नंबर दोन असंच चालतं! विस्थापित फक्त वापरासाठी असतात! काँग्रेसने प्रस्थापितांची राजकीय व्यवस्था निर्माण करून दृढ केल्यावर संघाने त्याच व्यवस्थेतील 'प्रस्थापित नंबर दोन' अशा लोकांची खदखद ओळखून त्यांना पोसलं आणि २०१४ पर्यंत एवढी संख्या वाढवली की लोकशाहीच्या खेळात यश मिळवलं! त्यामुळे आजच्या घडीला सत्तेत बरीच मंडळी काँग्रेससारख्या पुरोगामी कुटुंबांचेच सदस्य आढळतात! म्हणजे काकाच्या विरुद्ध पुतण्या शोधायचा, तर कधी गावित नंबर एक विरुद्ध गावित नंबर दोन!

त्यातल्या त्यात, राजकारणाकडे केवळ एक धंदा म्हणून पाहणाऱ्या महत्त्वाकांक्षी लोकांची देखील कमी नसते.

एक गोष्ट मात्र, संघ आपल्या मूळ व्यवस्थेतील विश्वासू लोकं ऐनवेळी मोक्याच्या ठिकाणी ठेवत असतो. आणि हे महाराष्ट्रासह सगळीकडे पाहायला मिळेल! थोडक्यात, तथाकथित लोकशाहीच्या खेळातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची संघासमोर काय किंमत असते, ते सप्टेंबर २०१५ मध्ये आपण सगळ्यांनी पाहिलं, जेव्हा मोदी सरकारातील मंत्र्यांना उभे करून संघनेत्यांनी उपदेश आणि आदेश दिले!

आणि संघाचं सगळ्यात मोठं संचित म्हणजे ऐतिहासिक कारणांमुळे तथाकथित उच्चवर्णीय मंडळी आधीच न्यायव्यवस्था, शिक्षण, मीडिया, शासकीय यंत्रणा, व्यापार इत्यादी ठिकाणी बहुसंख्येने कुंडली मारून बसली आहे, जिथं संघाला रिक्रुट करायला कष्ट घ्यावे लागत नाहीत!

थोडक्यात, संघर्ष करताना संघर्ष किती कठीण आहे, हे समजून घेणं आवश्यक असतं!

(भक्तांना सुट्टीच्या दिवशी अजून एक टास्क!)

शरद बाविस्कर,
(प्रा. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली)
(समाजमाध्यमातून साभार...)

नेमाडे आणि पुरोगामी ...पृष्ठ क्र. १० वरून

परंतु मूलतः या कादंबऱ्या गौण वाङ्:मय म्हणूनच समजल्या जातात. नेमाडेंच्या एकूण एक कादंबऱ्या याच धाटणीच्या आहेत.

कादंबरीच्या इतिहासाबद्दल घेताना नेमाडे आपल्या स्वतःच्या मर्यादित वकुबाच्या कादंबरीला पूरक ठरतील अशाच लेखनाचा व लेखकांचा सोयीस्कर गौरव करतात. उदाहरणार्थ गोडसे भटजी व साने गुरुजी. परंतु या दोघांनी जे लिहिले ते कादंबरी या स्वरूपाचे नाही. एकाचे प्रवास वर्णन आहे तर दुसऱ्याचे आत्मकथन. त्यामध्ये प्रसंगांची साखळी येणे हे स्वाभाविक आहे आणि योग्यही.

अठराव्या शतकानंतर कादंबरीच्या इतिहासात निवेदनात कथन तंत्रात अनेक मौलिक बदल घडले. कथनांचा आणि कथीत वास्तवाचा बेभरवंशीपणा उघडकीस आणणारे, अनेक परिप्रेक्ष्यातून कथावस्तू निराळी भासते हे सांगणारे, वास्तव व इतिहास हे देखील तथ्यात्मक नसते तर सापेक्ष असते हे दाखवणारे अनेक कथन प्रकार अस्तित्वात आले. ते नेमाडेंच्या गावचेही नाहीत. हे प्रयोग अस्तित्वात येण्याचे कारण आधुनिक समाजात वास्तव अधिकृतरित्या काही एक असते, हा समज धोक्यात आला. वास्तव हे कथननिर्मित असते. ते कथन निरपेक्ष नसते. त्यामुळे जितकी विविध कथने तितके निरनिराळे वास्तव. हा वस्तुनिष्ठपणाबद्दलचा संशय आधुनिक माणसाला महाकथनांपासून वाचवतो. म्हणजेच पर्यायाने अधिकारशाहीपासून, हुकूमशाही पासून वाचवतो. तो सहिष्णुता हे प्रमुख मूल्य मानतो.

नेमाडे मात्र मजेदार गोष्टी उथळपणाने सांगत राहिले. जोपर्यंत हे किस्से यांच्या नायकाच्या विविध महाविद्यालयातील अनुभवांचे होते तोपर्यंत ठीक होते. मात्र या किश्श्यांना जेव्हा त्यांनी हिंदुत्वाच्या महाकथनात गुंफले त्यावेळी असे प्रसंगांना एकमेकांमध्ये गुंफून किती धोकादायक निष्कर्ष काढले जातात याचा तो वस्तुपाठच झाला. हिंदुत्ववाद्यांचे हिंदुत्व असेच सुट्या सुट्या कथीत घटना, प्रसंग, माहिती यावर आधारित असते. इतिहासाची समग्र तर्क सुसंगत सैद्धांतिक बांधणी ते करू शकत नाहीत. कारण आत्ताचा आधुनिक राष्ट्रवाद भूतकाळावर आरोपीत करणे अनेक विसंगतींना जन्म देते. नेमाडेंचे किंवा संघाचे हिंदुत्व हे आधुनिक आहे. ऐतिहासिक नाही. त्यामुळे ते बेगडी आहे अस्सल नाही. आधुनिक व आधुनिकोत्तर विचारांमध्ये इतिहासाकडे बघण्याचा पवित्रा अज्ञेयवादी व संशयखोर असा आहे. इतिहासाचे आकलन नेहमी इतिहासकार किंवा इतिहास अभ्यासकाच्या कल्पनाव्यूहाने बाधित असते. ते स्वतंत्र वस्तुनिष्ठ असू शकत नाही.

नेमाडेंना हे मान्य नाही. भारत देश मुळापासूनच एक राष्ट्र होते, हा हिंदु राष्ट्रवादींचा सिद्धांत ते स्वीकारतात. त्यांच्या एकराष्ट्रीयत्वाचा आधार धर्म नसून गावगाडा आहे. भावविवशता, गतकातरता, भूतकाळाबद्दल खोटा जिव्हाळा या सिमेंटने ते त्यांच्या हिंदुत्वाची गढी बांधतात. या एकात्मतेला छेद देणाऱ्या नामांतरांसारख्या चळवळींबद्दलचे त्यांचे निवेदन लक्षात घेण्याजोगे आहे. जातीयतेच्या चर्चेची ते यथेच्छ टिंगल करतात. द हेड ऑफ डिपार्टमेंट वरून धेड ऑफ डिपार्टमेंट अशी अश्लाघ्य कोटी करतात. हा समाज दुभंगलेला आहे, ही वस्तुस्थिती ते हसण्यावरी नेतात.

भावविवशता खोटी भावूकता हा नेमाडेंचा अजून एक गुणविशेष त्यांच्या कवितांमध्ये या अप्रामाणिक भावनांशिवाय दुसरे काही नाही. ही भावूकता स्वीकारार्ह आणि विश्वसनीय होण्यासाठी एक व्यक्तिमत्त्व क्रयवस्तू म्हणून सादर करायला हवे. नेमाडेंनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे जे स्तोम माजवले आहे त्याचे कारण इथे कळते. आत्तासुद्धा परवाच्या कविता वाचनाच्या कार्यक्रमात त्यांनी गाणी आणि त्यांच्या व्यक्तिगत आठवणी अशा एकत्र पेश केल्या असे कळते. यांचे व्यक्तिमत्व वजा केले की त्यांच्या साहित्यात फारसे रुचकर असे उरत नाही. नेमाडेंनी मराठी साहित्याचा अजून एक केलेला मोठा गुन्हा म्हणजे कथा या वायय प्रकाराची प्रस्तुतता आणि महत्त्व नाकारले. एखादा वाङ्मय प्रकार समीक्षकाने नाकारणे हे सहसा होत नाही. वाङ्मय प्रकारांची चर्चा जॉन्र क्रिटिसिजम हा प्रघात आहे. परंतु त्या चर्चेमध्ये वाङ्मय प्रकारांमधल्या सीमारेषा, त्यांचे सत्व यांची चर्चा होते.

नेमाडे तसे करत नाहीत. ते कथा हा मुळातच गंभीर नसलेला, खोली नसलेला साहित्यप्रकार आहे असे मानतात. इंग्रजी साहित्य वाचून त्यांचा हा समज झाला असला तर ते काहीसे समजण्याजोगे आहे. परंतु मराठीमधील कथा वायय हे जगातील कथा वाग्मयांमध्ये सरस असे वायय आहे. आधुनिक मराठी कथा अतिशय सकस व समृद्ध आहे. नेमाडेंच्या बेजबाबदार शेरेबाजी मुळे या महत्त्वाच्या योगदानाकडे समीक्षकांचे काहीसे दुर्लक्ष झाले. हा काय प्रकार होता? असे कथा या प्रकारालाच मोडीत काढणे नेमाडेंच्या कुठल्या वैषम्यामुळे किंवा असुरक्षिततेमुळे झाले?

आपण मगाशीच पाहिल्याप्रमाणे नेमाड्यांचा नवीन कथन तंत्रांचा अभ्यास दिसत नाही. ते सरळ भाबडेपणाने वास्तववादी भूमिकेतून एका मागून एक प्रसंग किस्से विनोद वाचकांच्या मनोरंजनासाठी सांगत राहतात. कादंबरी चा अवकाश व आवाका मोठा असतो. त्या साहित्य प्रकारात अनेक प्रयोग करता येतात व करून झालेले देखील आहेत कथा तुलनेने लहान असली तरी ती किस्से व प्रसंग कथनापेक्षा मोठीच असते! नेमाडींची कादंबरी खरे तर अनेक लघुत्तम कथांची मालिकाच असते आणि हे नेमाडेंना कळत नसेल काय? त्यामुळे त्यांना लघुकथांचा देखील धाक वाटतो.

...राहुल पुंगलिया

बुद्धीवैभव विरुद्ध बुद्धिदारिद्र्य : ध्रुव राठी आणि पुरोगामी विचारांची ताकद!

ध्रुव राठी अफलातून हुशार आहे. फक्त ३२ वर्षांचा आहे. तो १७ व्या वर्षी शिक्षणासाठी जर्मनीत गेला. म्हणजे २०११ साली. अर्थात, मोदी पंतप्रधान होण्याआधीच विद्यार्थी म्हणून तिकडे गेला. २०२१ साली त्याचं जर्मन मुलीशी लग्न झालं. तिला तिकडे राहायचं आहे म्हणून तोही तिकडे राहिला. पण भारताचं नागरिकत्व त्यानं कधीच सोडलं नाही.

ध्रुव राठीची मुलाखत Brut या चॅनलवर आलीये. त्यात त्याला विचारलं की, तुला हे भाजपाचे गुंडं 'जर्मन शेफर्ड' म्हणतात, त्यावर तो म्हणतो की खरे जर्मन शेफर्ड तर हे आरएसएसवाले आहेत. यांच्या विचारधारेपासून गणवेशापर्यंत सर्वकाही जर्मनी आणि इटलीच्या प्रभावाखालचं आहे.

गोष्ट खरीच आहे. आरएसएसची विचारधाराच हिटलर आणि मुसोलिनीच्या राष्ट्रवादावर पोसली आहे. मुंजेंची शपथ! विचारधारा ते गणवेश सर्व काही जर्मन-इटालियन आहे. लष्करी गणवेश मुसोलिनीकडून घेतला आहे. भारतीयत्वाला पूर्णतः तिलांजली देऊन. भारतीय धोतर फेकून इटालियन अर्धी चड्डी घातली. इन-शर्ट तिकडूनच घेतला. काळी टोपी तिकडचीच. सॉक्स आणि शूज तिकडचेच. बेल्ट तिकडचाच. भारतीय बनावटीची एकही गोष्ट नाही.

तीच गत त्यांच्या संचलनातल्या वाद्यांची. साइड ड्रम, बास ड्रम, ट्रायँगल, सिम्बल, बासरी, बिगुल, ट्रम्पेट, सॅक्सोफोन, कॉर्नेट, क्लॅरिनेट, शंख ही त्यांची वाद्यं. यातले फक्त शंख आणि बासरी भारतीय आहेत. भारतीय मृदंग त्यांना चालत नाहीत, तंबोरे चालत नाहीत. कर्कश रणवाद्यं ते वाजवत आहेत, कोणतंही युद्ध नसलेल्या काळात. आज त्यांची सत्ता आहे, तरी कर्कश रणवाद्यं वाजवत फिरतात



दसऱ्याला शहरभर.

ध्रुव राठीवर मोदी-शहांनी त्यांचे हजारो पेड ट्रोल्स अथवा भाडोत्री टट्टू सोडले आहेत. ते दररोज भुंकून भुंकून थकतात. ध्रुव एक व्हिडिओ करून त्यांच्या कानफटात लावून मोकळा होतो.

दोन-तीन वर्षांखाली त्याला या नीच मीडियासेलच्या, अर्थात बापाच्या नावाचा आणि आडनावाचा पत्ता नसलेल्यांनी धमकी दिली की, जर्मनीत बसून काय टीका करतोस? भारतात येऊन दाखव. आलास की चोपतो आम्ही तुला. हा पठ्ठ्या जर्मनीतून आला. दिल्लीत इंडिया गेटसमोर उभा राहून स्वतःचा व्हिडिओ काढला आणि म्हणाला, या मला मारायला, आलोय मी भारतात! भाजप, संघ, विहिंप, बजरंग दलात एकही माई का लाल निघाला नाही, ज्यानं धमकी पूर्ण केली! घरात लपून बसले.

एक ध्रुव राठी. एक नेहा. एक अभिजित दीपके, एक आशुतोष रांका, एक सौरभ दास, एक कुणाल कामरा, एक विद्यानंद बापट, एक विवेकानंद पाटील.

ही एकेकटी मुलं भाजप आणि संघाच्या हजारो पेड ट्रोल्सचा एकहाती सामना करत आहेत आणि त्यांना भारी ठरत आहेत. संघपरिवार यातला एकही मुलगा त्यांच्याकडे घडवू शकलेला नाही, याची नोंद घ्यावी. आज ध्रुव राठीच्या वयाचा, त्याच्या पासंगाला पुरेल एवढा एकही हुशार पोरगा संघपरिवार घडवू शकलेला नाही, ही वस्तुस्थिती.

पुरोगामी विचारसरणीचं यश बुद्धीवैभवात आहे. पुरोगामी घरांमध्ये लहानपणापासून वेगळा विचार करण्याचं स्वातंत्र्य मिळतं, म्हणून बुद्धीची रंध्रं मोकळी राहतात. त्या रंध्रांमध्ये संघप्रणित धर्माची, संस्कृतीची, परंपरेची, अस्मितेची जळमटं साचत नाहीत, म्हणून वेगळा विचार करण्याची क्षमता निर्माण होते. 'आपलं जे आहे तेच जगात बरोबर आणि भारी' हा विचार म्हणजेच बुद्धीत कचरा साठणे. ही प्रक्रिया पुरोगामी मुलांच्या बाबतीत घडत नाही. त्यातूनच लाखांशी एकट्यानं लढा देऊ शकणारे ध्रुव राठी तयार होतात.

ही मुलं मोजकीच असतील, पण ती आज बलदंड सत्तेच्या नाकीनऊ आणत आहेत. बुद्धीवैभव हे एकच भांडवल घेऊन.

हा काळ आश्वासक आहे. बुद्धी विरुद्ध बुद्धिदारिद्र्य यात बुद्धीच जिंकणार, हे सांगणारा हा काळ आहे.

- निलेश केंकरे

ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित 'लोकशाही वाचवा, मत वाचवा, देश वाचवा' या घोषवाक्यांतर्गत ब्लॉकस्तरीय पदयात्रा व जनजागरण अभियान कार्यक्रमास धर्मराज्य पक्षाचे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी प्रमुख म्हणून उपस्थित राहून आपला सक्रिय सहभाग नोंदविला.

लोकशाही मूल्यांचे संवर्धन, मतदानाच्या अधिकाराविषयी जनजागृती आणि संविधानिक हक्कांचे रक्षण या उद्देशाने आयोजित या अभियानाच्या माध्यमातून लोकशाही अधिक बळकट करण्याचा संदेश देण्यात आला. लोकशाहीचे रक्षण ही केवळ एका पक्षाची जबाबदारी नसून, प्रत्येक जागरूक नागरिकाचे कर्तव्य आहे! लोकशाही, संविधान आणि जनतेच्या मतदानाच्या अधिकाराच्या रक्षणासाठी सर्व लोकशाहीप्रेमी शक्तींनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे... असं सर्व वक्त्यांनी मोर्चाला संबोधित करताना ठामपणे नमूद केलं.



Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०